रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १९ ◆ अंक ८४

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ रविवार, ११ ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

मद्यधुंद वाहनचालकाने चिरडले ; चौघे जखमी/२

रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४

नीरजा कदमची सॉफ्ट टेनिस स्पर्धेत चमक/८

### महिला व बालविकासावर पंतप्रधान मोदींकडून मार्गदर्शन



**नवी दिल्ली :** महिला सक्षमीकरण, बालपोषण, महिला सुरक्षा आणि बालसंरक्षण या महत्त्वाच्या विषयांवर भर देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्ली येथे महिला व बालविकास विभागाच्या दोन दिवसीय केंद्रीय परिषदेच्या समारोप सत्रात मार्गदर्शन केले. प्रत्येक बालकाला कुटुंबाचा अधिकार असून असुरक्षित बालकांना संस्थात्मक देखभालीऐवजी कुटुंब आणि समुदायाधारित पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी बालसंरक्षण यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला. केंद्रीय महिला व बालविकासमंत्री अन्नपूर्णा देवी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिषदेत विविध राज्यांचे महिला व बालविकास मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. या परिषदेत महाराष्ट्राच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी राज्यातील विविध प्रभावी उपक्रमांची माहिती सादर केली.

# दुष्काळ निवारणासाठी समन्वयाने काम करा

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अधिकाऱ्यांना निर्देश



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने, नियोजनबद्ध आणि गतिमान पद्धतीने काम करावे. पानी फाउंडेशनसह विविध स्वयंसेवी संस्थांच्या कामांना प्रशासकीय यंत्रणेने सक्रिय सहकार्य करून जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी समन्वयातून या मोहिमेला गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि.१०) दिले.

यावर्षी राज्यात वॉटर कप अभियान लवकर सुरू होत असून या पार्श्वभूमीवर वर्षा निवासस्थानी आयोजित जलसंधारणविषयक बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

दुष्काळाच्या आव्हानावर मात करण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. यापूर्वी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, कृषी विभागाचे अधिकारी आणि क्षेत्रीय यंत्रणेने विविध कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत उत्तम नेतृत्व व कार्यक्षमता दाखविली आहे. अडचणीच्या काळात प्रशासकीय यंत्रणा उत्साहाने आणि जबाबदारीने कामाला लागल्यास कामाचा वेग वाढतो हे आपण अनुभवले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात पहाटेपासून काम सुरू असल्याचे चित्र यापूर्वी दिसले आहे. त्याच कार्यतत्परतेने आणि समर्पित भावनेने आता जलसंधारणाच्या कामांसाठी पुढाकार घेण्याची गरज आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

जलसंधारणाची ही महत्त्वपूर्ण मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्व अधिकारी आणि संबंधित यंत्रणांनी एकजुटीने सहभागी व्हावे आणि या मोठ्या लढाईसाठी सज्ज व्हावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

या बैठकीस नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, एटीई चंद्रा फाउंडेशनचे अमित चंद्रा, पानी फाउंडेशनचे सत्यजित भटकळ, अभिनेते आमिर खान, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन–नैनुटीया, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आदी उपस्थित होते. पशुसंवर्धन विभागाचे सचिव एन. रामास्वामी तसेच राज्यातील सर्व जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

### जलसंवर्धनासाठी लोकसहभाग वाढवणे आवश्यक -आमिर खान

आगामी उन्हाळ्यापासून जलसंधारणाची कामे सातत्याने राबविणे गरजेचे आहे. जानेवारी ते मे या कालावधीत शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण व जनजागृती उपक्रम राबवून पावसाळ्यापूर्वी जलसंधारणाच्या कामांना गती देण्यात येईल. यंदाचे वर्ष आव्हानात्मक असले तरी निराशेचे रूपांतर आशेत करून जनतेमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करणे आवश्यक आहे. पाण्याचा पुनर्वापर, भूजल पुनर्भरण आणि जलस्रोतांचे संवर्धन यावर भर देतानाच राज्यातील प्रत्येक गावातील प्रत्येक घराने जलसंवर्धनाच्या कार्यात सहभागी व्हावे, असे अभिनेते आमिर खान यांनी यावेळी सांगितले.

## एसआयआर प्रक्रियेसंदर्भात आढावा बैठक

■ बिल्डिंग प्रमुख आणि बीएलए २ यांचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



मतदार यादीच्या एसआयआर प्रक्रियेसंदर्भातील आढावा बैठकीचे आयोजन शुक्रवारी पनवेल मार्केट येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात करण्यात आले होते. ही बैठक आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यावेळी कर्तव्यदक्ष बिल्डिंग प्रमुख आणि बीएलए २ यांचा सन्मान करण्यात आला.

बैठकीदरम्यान मतदार यादीच्या सखोल पुनरीक्षण प्रक्रियेवर विस्तृत चर्चा करण्यात आली. मतदार यादीतील नोंदी अत्यंत अचूक ठेवणे, एकही पात्र मतदार नावनोंदणीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेणे आणि नागरिकांमध्ये या प्रक्रियेबाबत आवश्यक जनजागृती निर्माण करणे या मुद्द्यांवर विचारविनिमय करण्यात आला. या संपूर्ण मोहिमेत बीएलए २ यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून त्यांच्या जबाबदाऱ्या व परस्पर समन्वयावर बैठकीत विशेष भर देण्यात आला.

या बैठकीला बीएलए १ प्रमुख तथा नगरसेवक परेश ठाकूर, पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, प्रभाग समिती 'ड'चे सभापती अजय बहिरा, नगरसेवक सुमित झुंजारराव, अमर पाटील, नरेश ठाकूर, विकास घरत, दशरथ म्हात्रे, नगरसेविका उषा अडसुळे, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, मयुरेश नेतकर, युवा नेते सतीश पाटील, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, कामोठे मंडळ अध्यक्ष तेजस जाधव यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## आंदोलनस्थळी ड्रोनप्रकरणी गुन्हा

**पुणे : प्रतिनिधी**

नवी पेठेतील एस.एम. जोशी पुलावरील एमपीएससी परीक्षार्थ्यांच्या आंदोलनस्थळी विनापरवानगी ड्रोन उडविल्याप्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी विद्यार्थी प्रतिनिधींसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

एमपीएससी आंदोलनाशी संबंधित दाखल करण्यात आलेला हा दुसरा गुन्हा आहे. याबाबत हवालदार युवराज टोळे यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

## आंदोलकांची पोलिसांकडून धरपकड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



राजधानी दिल्लीत विनापरवानगी आंदोलन करण्याचा प्रयत्न करणारे नेते, विद्यार्थी प्रतिनिधी आंदोलकांची पोलिसांनी शनिवारी (दि. १०) धरपकड केली. अनेकांना ताब्यात घेऊन स्थानबद्ध करण्यात आले.

दिल्लीतील जंतरमंतरवर कॉक्रोच जनता पक्षाने आंदोलनाची हाक दिली होती. त्यासाठी संस्थापक अभिजीत दिपकेंसह आयोजक सौरव दास व आशुतोष रांका यांना जात असताना पोलिसांनी त्यांना विमानातूनच ताब्यात घेतले, तर दिल्लीच्या रस्त्यावर विद्यार्थी संघटना आणि विरोधी पक्षातील पदाधिकारी उतरले. या पार्श्वभूमीवर निमलष्कर दलासह पोलिसांचा फौजफाटा सज्ज होता.

यावेळी आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल, तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. तसेच युट्यूबर ध्रुव राठी याला गुरुग्राम येथील निवासस्थानाहून ताब्यात घेण्यात आले. विशेष म्हणजे मुंबईतही महात्मा गांधींचे नातू तुषार गांधी, अभिनेता इम्रान खान आदींनाही स्थानिक पोलिसांनी ताब्यात घेऊन स्थानबद्ध केले.



## केंद्रीय पथकाकडून पाहणी, शेतकऱ्यांशी संवाद

**सोलापूर : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या केंद्रीय पथकाने सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून पीक नुकसान, पिण्याच्या पाण्याची टंचाई, भूजल पातळी, जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता तसेच रब्बी हंगामाच्या शक्यतांचा आढावा घेतला.

उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी, मंगळवेढा तालुक्यातील विविध गावांमध्ये पथकाने शेतकऱ्यांशी संवाद साधून दुष्काळामुळे झालेल्या नुकसानीची माहिती जाणून घेतली. या पथकाचे नेतृत्व कृषी व शेतकरी कल्याण विभागाच्या पीक विभागाचे संचालक डॉ. के. पोनुसामी यांनी केले.

पथकामध्ये पेयजल व स्वच्छता विभागाचे अबसार अहमद खान आणि अन्न व सार्वजनिक वितरण विभागाचे सहायक संचालक सुमित शर्मा यांचा समावेश होता.

(सविस्तर पान २ वर..)

## निवडक

### फ्लायदुबई विमान हल्ल्याची 'एनआयए' करणार चौकशी

**नवी दिल्ली :** फ्लायदुबई कंपनीच्या विमानात ओमानच्या सह–वैमानिकाने कॅप्टन स्मित मच्छार यांच्यावर केलेल्या हल्ल्यामागे एखादे मोठे आंतरराष्ट्रीय कारस्थान किंवा दहशतवादी कट होता का याचा शोध घेण्यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाने राष्ट्रीय तपास यंत्रणेला (एनआयए) या प्रकरणाची सूत्रे हाती घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार एनआयएने गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### 'वारी'वरील माहितीपटाचा जागतिक स्तरावर सन्मान

**मुंबई :** पंढरपूर आषाढी वारीचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत निर्मिती करण्यात आलेल्या 'पंढरपूर वारी–इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' या माहितीपटाची प्रतिष्ठित एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स २०२६मध्ये सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम श्रेणीत भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली आहे.

## प्रदीप पूर्णेकर हत्येप्रकरणी मुख्य आरोपीसह दोघांना अटक

**ठाणे : प्रतिनिधी**



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे ठाणे येथील विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्याकांडात गुन्हे शाखेला एक मोठे यश आले आहे. या हत्याकांडामधील मुख्य आरोपी असणारा संतोष कनौजिया उर्फ टल्ली आणि त्याच्यासोबत असलेला दुसरा आरोपी अमित सिंह या दोघांना पोलिसांनी उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथून बेड्या ठोकल्या आहेत.

मुख्य आरोपी संतोष मेहिलाल कनौजिया उर्फ टल्ली (४१) हा ठाण्यातील कापूरबावडी परिसरातील दुर्गानगरमध्ये राहून लाँड्रीचे काम करायचा. तो मूळचा उत्तर प्रदेशमधील वाराणसी जिल्ह्यातील गहनी गावाचा राहणारा आहे. त्याच्यासोबत पकडलेला दुसरा आरोपी अमित जयकिशन सिंह उर्फ पपलू (३४) हा ऑटो रिक्षाचालक असून तो मीरा–भाईंदर परिसरात राहत होता आणि तोही मूळचा वाराणसीच्या बाबियाव गावचा रहिवासी आहे. हत्येच्या वेळेस हाच दुसरा आरोपी हेल्मेट घालून सोबत होता, अशी माहिती समोर आली आहे.

२९ सप्टेंबर रोजी प्रदीप पूर्णेकर यांची हत्या करण्यात आली होती. या भीषण घटनेनंतर दोन्ही आरोपी रायगड जिल्ह्याच्या दिशेने पळाले आणि तिथून नंतर उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथे जाऊन लपले होते. ठाणे पोलिसांच्या विशेष पथकाने अत्यंत शिताफीने उत्तर प्रदेशात विशेष अभियान राबवून या दोघांना अखेर जेरबंद केले.

याआधी ठाणे पोलिसांनी या प्रकरणात सुभाष उर्फ पप्प्या शिंदे, निखिल यादव आणि नितेश पवार अशा तीन जणांना आधीच अटक केली होती. आता संतोष कनौजिया आणि अमित सिंह यांच्यामुळे अटकेतील आरोपींची संख्या पाच झाली आहे.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाला बेस्ट ज्युनिअर कॉलेज स्टार अवॉर्ड

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**खारघर : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाला टाइम्स ऑफ इंडिया वृत्तपत्राकडून बेस्ट ज्युनिअर कॉलेज स्टार अवॉर्ड प्राप्त झाला आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले.

रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्टता तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने केलेल्या प्रयत्नांची दखल घेत हा पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्यातील कौशल्ये, मूल्ये, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी विद्यालयात विविध उपक्रम राबविले जातात. त्याच कार्याचे हे फलित आहे.

या यशामागे शिक्षकवृंदाचे अथक परिश्रम, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचा विश्वास व पाठिंबा यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. सामूहिक प्रयत्न, समर्पण आणि शैक्षणिक गुणवत्तेबाबतची बांधिलकी यामुळेच विद्यालयाला हा बहुमान प्राप्त झाला आहे.

या पुरस्काराबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक केले. यावेळी व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे, सदस्य ॲड. राहुल घरत, विद्यालयाच्या प्राचार्य डॉ. निशा नायर आदी उपस्थित होते.

## आजपासून आदिशक्तीचा जागर!

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त होणार घटस्थापना



**अलिबाग : प्रतिनिधी**

हिंदू संस्कृतीतील अत्यंत महत्त्वाचा आणि आदिशक्तीच्या भक्तीचा सण असलेला शारदीय नवरात्रोत्सव रविवार (दि.११)पासून मोठ्या उत्साहात सुरू होत आहे. या पार्श्वभूमीवर सर्वत्र भक्तीचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून घरोघरी पारंपरिक पद्धतीने आणि धार्मिक विधींनुसार घटस्थापना केली जाणार आहे.

यानिमित्ताने घरांची साफसफाई, देव्हाऱ्यांची सजावट आणि पूजेच्या विधींची तयारी पूर्ण झाली असून बाजारपेठांमध्ये पूजा साहित्य, मातीचे घट, देवीच्या मूर्ती, चुनरी आणि विविध प्रकारच्या फुलांच्या खरेदीसाठी भाविकांची मोठी वर्दळ पाहायला मिळत आहे.

घरोघरी होणाऱ्या घटस्थापनेसोबतच विविध सार्वजनिक मंडळांमध्येही मोठ्या थाटामाटात देवीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. विविध मानाच्या आणि प्रसिद्ध देवी मंदिरांसह गल्लोगल्लीतील सार्वजनिक मंडळांच्या भव्य मंडपांची आणि आकर्षक विद्युत रोषणाईची कामे अंतिम टप्प्यात आली असून नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवासाठी सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

या उत्सवाचे मुख्य आकर्षण असलेला दांडिया रास आणि गरबा खेळण्यासाठी तरुणाईमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत असून रंगीबेरंगी पारंपरिक कपडे आणि दांडिया खरेदीसाठी बाजारात मोठी गर्दी झाली आहे. रात्रीपासूनच ढोल–ताशांच्या आणि पारंपरिक गाण्यांच्या तालावर गरब्याचे रंगतदार सामने रंगणार असून उदे गं अंबे उदे आणि बोला अंबा माता की जय... अशा जयघोषाने वातावरण भक्तिमय होणार आहे.

### विविध कार्यक्रम अन् खेळ

*नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत सार्वजनिक मंडळांच्या वतीने दररोज आरती, भजन, कीर्तन आणि इतर कार्यक्रमांचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय महिला आणि बालकांसाठी विविध स्पर्धा, मनोरंजनात्मक खेळ होणार आहेत. यातील विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे.*



# केंद्रीय पथकाकडून महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी; शेतकऱ्यांशी संवाद



## सोलापूर जिल्ह्यात घेतला सविस्तर आढावा

**सोलापूर : प्रतिनिधी**

खरीप हंगामातील दुष्काळी परिस्थिती आणि पीक नुकसानीची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी केंद्र शासनाच्या आंतर-मंत्रालयीन केंद्रीय पथकाने बार्शी तालुक्यातील उपळाई ठोंगे व पानगाव येथे प्रत्यक्ष शेतपाहणी केली. पावसाअभावी जळालेली सोयाबीनची पिके, तूरपिकांची स्थिती आणि पानगाव येथील पूर्णपणे कोरडा पडलेला साठवण तलाव यांची पाहणी करून पथकाने शेतकऱ्यांशी संवाद साधला.

केंद्रीय पथकाचे नेतृत्व कृषी व शेतकरी कल्याण विभागाच्या पीक विभागाचे संचालक डॉ. के.पोन्नुसामी करीत आहेत. पथकामध्ये पेयजल व स्वच्छता विभागाचे टीम लीडर अबसार अहमद खान आणि अन्न व सार्वजनिक वितरण विभागाचे सहाय्यक संचालक सुमित शर्मा यांचा समावेश आहे. कृषी आयुक्तसूरज मांढरे हेदेखील पथकासोबत उपस्थित होते.

पथकाने पानगाव येथील साठवण तलावाचीही पाहणी केली. तलाव पूर्णपणे कोरडा पडल्याचेनिदर्शनास आले. बार्शी तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीची तीव्रता यावरून स्पष्ट होत असल्याची माहितीप्रशासनाच्या वतीने पथकाला देण्यात आली.

उपळाई ठोंगे येथे लता शेळवणे यांच्या शेतातील सोयाबीन पिकाची पाहणी करण्यात आली. त्यांचेबंधू कल्याण चव्हाण यांनी पथकाला पीक नुकसानीची माहिती दिली. चार एकर क्षेत्रात पीक घेण्यासाठी प्रति एकर २० ते २५ हजार रुपये खर्च झाला असून, पीक पूर्णपणे नष्ट झाल्याने उत्पादन मिळण्याची शक्यता नसल्याचे त्यांनी सांगितले.

पथकाने पेरणीपासून झालेला पाऊस, पावसातील खंड, पिकांची वाढ, गावातील एकूण पेरणी क्षेत्र,सोयाबीन व इतर पिकांचे क्षेत्र, आंतरपीक पद्धती तसेच भूजल पातळी याबाबत माहिती घेतली.जनावरांसाठी चारा उपलब्धतेची स्थिती जाणून घेत चारा डेपो सुरू करणे किंवा चारा छावण्या उभारणेयापैकी कोणता पर्याय अधिक उपयुक्त ठरेल, याबाबतही शेतकऱ्यांची मते विचारात घेतली. पिण्याच्यापाण्याची टंचाई दूर करण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केंद्रीय पथकाला जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, पीकनुकसानीची व्याप्ती आणि पाणीटंचाईबाबत माहिती दिली. जिल्ह्यातील सर्व ११ तालुके दुष्काळग्रस्तघोषित करण्यात आले असून सध्या १०८ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. पीक नुकसानीचे आतापर्यंत ६०टक्के पंचनामे पूर्ण झाले असून पुढील दोन ते तीन दिवसांत शंभर टक्के पंचनामे पूर्ण करून शासनालाअहवाल सादर करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

या पाहणी दौऱ्यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन,निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, प्रांताधिकारी सदाशिव पडदुने, पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद काटकर, उपविभागीयकृषी अधिकारी संजय वाकडे, गटविकास अधिकारी विवेक जमदाडे, तहसीलदार एफ. आर. शेख, मृद वजलसंधारण विभागाचे रामचंद्र क्षीरसागर, तालुका कृषी अधिकारी संतोष कोल्हे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

सरासरी ५२८.१० मिमी पावसाच्या तुलनेत केवळ २९१.३४ मिमी म्हणजे ४४.८३% तूट व २१ ते ४४ दिवसांचा कोरडा काळ यामुळे सर्व १३८ गावे व १,१२,२२६ हेक्टर क्षेत्र दुष्काळबाधित झाले असून ७३,४२४ हेक्टरवर (६५.४२%) दुष्काळ नुकसानीची स्पॉट पाहणी पूर्ण झाली असल्याची माहिती केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकासमोर प्रशासनाने दिली.

## तळोजात ड्रग्ज तस्करीचे रॅकेट; नायजेरियन व्यक्ती जाळ्यात



**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबईला अमली पदार्थमुक्त करण्याच्या मोहिमेत पोलिसांनी तळोजातील रोहिंजण गावात मोठी कारवाई करत नायजेरियन नागरिकाला अटक केली आहे. आरोपीकडून तब्बल तीन कोटी ५७ लाख ९१ हजार २०० रुपये किमतीचे मेफेड्रोन (एमडी) आणि कोकेन जप्त करण्यात आले. अमली पदार्थविरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी रोहिंजन गावात सापळा रचला.

संशयिताला ताब्यात घेतल्यानंतर त्याची झडती आणि घराची तपासणी करण्यात आली. यावेळी दोन किलो ४९७ ग्रॅम एमडी आणि ५६६ ग्रॅम कोकेन असा मोठा साठा पोलिसांच्या हाती लागला. अटक केलेल्या आरोपीचे नाव एनी इकेचुकवू डार्लिंगटन (४१, मूळचा नायजेरिया) असे आहे. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार आरोपीविरोधात २०१९ मध्ये अमली पदार्थ तस्करीचे प्रकरण दाखल झाले होते. त्या प्रकरणात त्याला सात वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. शिक्षा भोगून काही महिन्यांपूर्वी बाहेर आल्यानंतर तो पुन्हा अमली पदार्थ तस्करीत सक्रिय झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे त्याच्या नेटवर्कचा शोध घेण्याचे आव्हान तपास यंत्रणांसमोर आहे. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई पोलिसांनी अमली पदार्थविरोधी मोहीम तीव्र केली आहे. नागरिकांना अमली पदार्थ तस्करीसंदर्भात माहिती असल्यास ८८२८११२११२ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## नवी मुंबईत १६ ऑक्टोबरपासून पुन्हा १० टक्के पाणीकपातीचे संकेत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सणांच्या पार्श्वभूमीवर मागे घेतलेली पाणीकपात पुन्हा लागू करण्याची वेळ नवी मुंबई महापालिका प्रशासनावर येण्याची शक्यता आहे. राज्य शासनाने एल निनोचा संभाव्य प्रभाव आणि पावसातील तूट लक्षात घेऊन १६ ऑक्टोबरपासून सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना किमान १० टक्के पाणीकपात करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयाच्या अधीन राहून नवी मुंबईतही कपात लागू करण्याचे नियोजन सुरू आहे.

शुक्रवारी (९ ऑक्टोबर) सकाळी मोरबे धरणाची पाणीपातळी ८५.५८ मीटर, म्हणजेच ८७.९१ टक्के नोंदविण्यात आली. धरणात पुरेसा पाणीसाठा असला, तरी पुढील पावसाळ्यापर्यंत शहराला नियमित पाणीपुरवठा करता यावा, यासाठी उपलब्ध साठ्याचे नियोजन करण्यावर प्रशासनाचा भर आहे. एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे आणि पावसातील तुटीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देत पाणीकपातीचे निर्देश दिले आहेत.

यापूर्वी मोरबे धरणातील वापरायोग्य पाणीसाठा कमी झाल्याने नवी मुंबईत १० टक्के पाणीकपात लागू करण्यात आली होती. काही भागांत ठरावीक दिवशी पाणीपुरवठा बंद ठेवण्याचे वेळापत्रकही राबविण्यात आले. वाहन धुलाईसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर टाळणे आणि जलतरण तलावांचा पाणीपुरवठा बंद करणे अशा उपाययोजनांद्वारे पाणीबचतीचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, पावसाळ्यात धरणातील साठा वाढल्यानंतर गोकुळाष्टमी आणि गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी महापालिकेने पाणीकपात मागे घेतली होती.

आता राज्य शासनाच्या नव्या निर्देशांमुळे पाणीकपातीचा विषय पुन्हा ऐरणीवर आला आहे. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या नेतृत्वाखाली उपलब्ध पाणीसाठा आणि शहराची मागणी यांचा आढावा घेतला जात आहे. पाणीगळती रोखणे, अनावश्यक वापरावर नियंत्रण आणणे आणि प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर वाढविण्यावर भर दिला जाणार आहे.

घणसोलीतील सिम्पलेक्स वसाहतीसह काही भागांत कमी वेळ आणि कमी दाबाने पाणी मिळत असल्याच्या तक्रारी आहेत.त्यामुळे संभाव्य पाणीकपातीपूर्वीच या भागांतील पाणीपुरवठ्याच्या समस्या सोडविण्याचे आव्हान महापालिकेसमोर आहे. राज्य शासनाच्या निर्देशानुसार १६ ऑक्टोबरपासून कपात लागू करण्याबाबत महापालिका प्रशासनाकडून आढावा घेतला जात असून, उपलब्ध पाणीसाठा आणि शहराची गरज लक्षात घेऊन अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

## मध्य रेल्वेच्या ‘स्वच्छता रथ’द्वारे १.६८ लाख किलो कचरा विल्हेवाटीसाठी नेला वाहून

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या "स्वच्छता रथ" (किंवा 'मक विशेष रेल्वे' – गाळ/कचरा वाहून नेणारी विशेष गाडी) ने ४ ऑक्टोबर रोजी रविवारच्या ब्लॉकदरम्यान राबवलेल्या विशेष मोहिमेत १.६८ लाख किलो गाळ, टाकाऊ पदार्थ आणि कचरा साफ करून व त्याची वाहतूक करून 'स्वच्छता पंधरवडा' मोहिमेला गती दिली.ही विशेष मोहीम सध्या सुरू असलेल्या 'स्वच्छता पंधरवाडा' आणि 'विशेष मोहीम ६.०' चा एक भाग होती.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते दादर दरम्यानच्या रुळांच्या बाजूला साचलेला कचरा आणि गाळ साफ करण्याच्या कामासाठी सकाळी ११:०० ते दुपारी ३:०० या वेळेत 'मक विशेष ब्लॉक'' घेण्यात आला. या मार्गावर "स्वच्छता रथ" चालवण्यात आला.या ब्लॉक कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मशीद, परळ, दादर आणि माटुंगा स्थानकांवर कचरा आणि गाळ गोळा करण्याची विशेष मोहीम राबवण्यात आली.

या मोहिमेअंतर्गत स्थानक परिसर आणि कचरा साचण्याची शक्यता असलेल्या निश्चित केलेल्या ठिकाणांवरून गाळ, कचरा, टाकाऊ पदार्थ आणि इतर अनावश्यक अवशेष गोळा करून ते हटवण्यावर भर देण्यात आला.या मार्गावरून एकूण १.६८ लाख किलो गाळ आणि कचरा गोळा करण्यात आला आणि तो "स्वच्छता रथ" द्वारे वाहून नेण्यात आला. गोळा केलेला कचरा २,८०० गोण्यांमध्ये भरून, अधिकृत स्वच्छता व्यवस्थेद्वारे विल्हेवाट/प्रक्रिया केंद्रांवर पोहचवण्यात आला.

या मोहिमेत ट्रॅकमन, स्वच्छता कर्मचारी, हाऊसकीपिंग पथके आणि पर्यवेक्षक यांचा सहभाग होता. कचरा त्वरित हटवणे, कचरा साचण्यास प्रतिबंध करणे आणि स्थानकाचा परिसर स्वच्छ व आरोग्यदायी राखणे यावर यात भर देण्यात आला. पर्यवेक्षक, कर्मचारी आणि कंत्राटी कामगारांसह एकूण ८८१ कर्मचाऱ्यांनी हा ब्लॉक यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी काम केले.

मुंबई विभागाच्या सुरू असलेल्या ‘स्वच्छता पंधरवडा’ आणि ‘स्वच्छता ही सेवा’ या उपक्रमांच्या अनुषंगाने, रेल्वे मार्ग आणि स्थानके अधिक स्वच्छ ठेवण्यासाठी तसेच कचऱ्याचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी ‘मक विशेष ब्लॉक’ आणि ‘स्वच्छता रथ’ यांनी मोलाची भूमिका बजावली आहे.

रेल्वे मार्गांची स्वच्छता राखण्यासाठी, मध्य रेल्वेद्वारे ‘स्वच्छता रथ’ किंवा ‘मक विशेष रेल्वे’ (कचरा वाहून नेणारी विशेष गाडी) चालवली जाते, जी मार्गावरील गाळ आणि कचरा गोळा करून त्यांची विल्हेवाट लावते. मार्गालगत टाकलेल्या गाळामुळे आणि कचऱ्यामुळे केवळ मार्गाचे विद्रूपीकरणच होत नाही, तर त्याखालील निचरा वाहून नेणाऱ्या वाहिन्या देखील तुंबतात; परिणामी पावसाळ्यात रेल्वे मार्गांवर पाणी साचण्याची समस्या निर्माण होते. रविवारी घेण्यात येणाऱ्या ‘मेगा ब्लॉक’ दरम्यान, साफ केलेला गाळ आणि कचरा गोणींमध्ये भरला जातो आणि त्यानंतर तो ‘स्वच्छता रथ’ या विशेष गाड्यांमध्ये चढवला जातो. एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत मुंबई विभागात एकूण १.९१ लाख घनमीटर गाळ आणि कचरा साफ करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली.

## टाकावूपासून टिकाऊ! शैक्षणिक साधने आणि वस्तू निर्मिती उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवीन पनवेल यांच्या वतीने ‘टाकाऊपासून टिकाऊ – शैक्षणिक साधने व वस्तू निर्मिती’ या अभिनव उपक्रमाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. बी.एड.च्या विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेला कृतीची जोड देत टाकाऊ व वापरानंतर निरुपयोगी ठरणाऱ्या वस्तूंमधून उपयुक्त, आकर्षक आणि अध्यापन–अधिगम प्रक्रियेला पूरक ठरणाऱ्या विविध शैक्षणिक साधनांची निर्मिती केली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा, कलात्मक दृष्टिकोनाचा आणि पर्यावरणाप्रती असलेल्या संवेदनशीलतेचा प्रत्यय घडविणारे देखणे प्रदर्शन साकारले.



या प्रदर्शनाचे उद्घाटन इन्फिनिटी फाउंडेशनचे अध्यक्ष अयुफ आकूला आणि मुंबई उच्च न्यायालयाचे वकील अ‍ॅड. सिद्धेश गावकर यांच्या हस्ते करण्यात आले. मान्यवरांनी प्रदर्शनातील विविध शैक्षणिक साधनांची पाहणी करून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे आणि परिश्रमांचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नावीन्यपूर्ण विचार, समस्या निराकरणाची क्षमता, संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोन विकसित होतो, असे मार्गदर्शनही त्यांनी केले.

या उपक्रमामुळे बी.एड.च्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साधननिर्मितीचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. उपलब्ध साधनसामग्रीचा प्रभावी वापर करून कमी खर्चात दर्जेदार शैक्षणिक साहित्य कसे तयार करता येते, याची जाणीव विद्यार्थ्यांना झाली. विशेषतः भावी शिक्षक म्हणून वर्गातील अध्यापन अधिक रंजक, विद्यार्थीकेंद्रित, कृतीप्रधान आणि परिणामकारक करण्यासाठी या अनुभवाचा निश्चितच उपयोग होणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बी.एड. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनी सौ. पाटील यांनी केले, तर सूत्रसंचालन विद्यार्थिनी वर्षा भगत यांनी प्रभावीपणे केले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विनायक लोहार, डॉ. नेहा म्हात्रे, डॉ. प्रितेश वाढे, प्रा. निलेश अडसूळे, प्रा. सुषमा संकपाळ, प्रा. पूनम कोठकर, प्रा. सुनीता राठोड आणि श्री. महेश जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मद्यधुंद चालकाने वाहनांना चिरडले; चार जण जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

साजगांव औद्योगिक वसाहतीमधून मुंबईस माल घेऊन जाणाऱ्या ट्रकने समोर येणाऱ्या वाहन चालकांना ठोकर मारीत कोणाला हुलकावणी देत तर मार्गावर आट्यापाट्या खेळासारखा ट्रक चालवीत ३ किमी चा प्रवास केला शेवटी सारसन गावाजवळ उभ्या असणाऱ्या ट्रकला धडक देऊन मार्गावरच कोसळला. या ३ किमी अंतराच्या मार्गावर ४ मोटारसायकल, टेम्पो तसेच टाटा स्टील कंपनीच्या बसला धडक दिली या अपघातात ४ जण जखमी झाले असून जखमींना खोपोली नगरपालिकेच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींमध्ये चालकाचा ही सामावेश आहे.

संध्याकाळ असल्याने काही पादचारी मार्गालगत पायी चालत तर काही मोटारसायकल स्वार घरी जाण्याच्या बेतात मार्गावरुन निघाले होते. टाटा स्टील कंपनीचे कामगार इसांबाफाटा येथून कंपनीच्या बसने खोपोली कडे आपल्या घरी निघाले होते. त्याच दरम्यान साजगांव औद्योगिक वसाहतीमधून हा ट्रक निघाला आणि साजगांव ताकाई एन पि ढाबा या मार्गाने सुसाट वेगाने निघाला. मार्गावर प्रचंड आरडाओरडा झाली काही ग्रामस्थांनी ट्रकला अडविण्याचा प्रयत्न केला मात्र चालकाने त्यांच्या ही अंगावर ट्रक घालण्याचा प्रयत्न केला सतर्क ग्रामस्थ बाजूला झाल्याने त्यांना कुठल्याही प्रकारची दुखापत झाली नाही.

या ग्रामस्थांनी वाहन चालकांना या ट्रक पासुन दुर होण्याचा आवाज दिला त्यामुळे वाहन चालक बाजूला झाले. या ट्रक साजगाव ते सारसण फाटा येथ पर्यंत आट्यापाट्या खेळासारखा ट्रक चालवीत सुसाट जात समोर उभ्या असणाऱ्या ट्रक ला धडकला. आणि पलटी झाला. ही घटना शनिवारी सायंकाळी खोपोली पेण मार्गावरील सारसन पंपासमोर घडली.



## महापौर सुजाता पाटील यांनी घेतला महासभेत मंजूर ठरावांच्या सद्यस्थितीचा आढावा



**नवी मुंबई : बातमीदार**

फेब्रुवारी २०२६ मध्ये सर्वसाधारण सभेस सुरूवात झाल्यानंतर मंजूर झालेल्या विविध ठरावांवर महापालिका प्रशासनामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीची स्थिती जाणून घेण्यासाठी नवी मुंबईच्या महापौर श्रीम.सुजाता पाटील यांनी विशेष बैठक घेत विभागनिहाय आढावा घेतला.

याप्रसंगी उपमहापौर दशरथ भगत, स्थायी समिती सभापती अशोक पाटील, आरोग्य समिती सभापती डॉ.जयाजी नाथ, कामकाज पूरक तदर्थ समिती सभापती सुरज पाटील, नगरसेवक रविंद्र इथापे व नेत्रा शिर्के तसेच अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिग्विजय चव्हाण, मुख्य लेखा परीक्षक .राजेंद्र गाडेकर, महापालिका सचिव संघरत्ना खिल्लारे आणि इतर विभागप्रमुख व अधिकारी उपस्थित होते.ट

यावेळी महापौरांनी माहे फेब्रुवारीपासून महासभेत मंजूर झालेल्या ठरावांचा आढावा घेताना ठरावांवर कार्यवाही सुरू आहे असे नमूद करताना त्यासोबत त्या ठरावाच्या अंमलबजावणी कार्यवाहीची सद्यस्थिती व प्रमाण नमूद करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.बैठकीमध्ये विचारविनीमय करावयाच्या विषयांची विषयपत्रिका बैठकीस उपस्थित सर्व सदस्यांना द्यावी असेही निर्देशित करण्यात आले.

धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षित असलेल्या ठरावांची स्वतंत्र यादी असावी आणि नागरी सुविधांशी संबंधित ठरावांची स्वतंत्र यादी असावी असेही महापौरांमार्फत निर्देश देण्यात आले. यानुसार लवकरच विशेष बैठक आयोजित केली जाणार असून त्यावेळी केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने सर्व विभागप्रमुखांनी अद्ययावत माहितीसह उपस्थित रहावे असे स्पष्ट निर्देश महापौर सुजाता पाटील यांनी बैठकीमध्ये दिले.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत खारघरमध्ये आरोग्य तपासणी शिबिर





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सेवा संकल्प अभियान २०२६ अंतर्गत पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभाग आणि वैद्यकीय आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने प्रभाग ब, खारघर अंतर्गत प्रभाग समिती कार्यालयात शनिवारी (दि. १०) विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी महापौर नितीन पाटील, बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे, प्रभाग समिती ब चे सभापती मधु पाटील, नगरसेविका उषा अजित अडसूळ, नगरसेवक समीर कदम उपस्थित होते.

यावेळी महापौर नितीन पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता म्हात्रे यांनी आरोग्य शिबिराविषयी माहिती दिली. या शिबिरांमध्ये महिलांना विविध आरोग्यविषयक समस्यांवर मोफत तपासणी तसेच तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळाले. सांधेदुखी, गुडघेदुखी, हाता-पायांची सूज व मुंग्या येणे, नसांशी संबंधित त्रास तसेच मान, पाठ व कंबरदुखी अशा समस्यांवर मोफत तपासणी व तज्ज्ञ मार्गदर्शन देण्यात आले. तसेच उच्च रक्तदाब, मधुमेह, नेत्ररोग व दंतरोग तपासणी, स्तन व गर्भाशय मुख कर्करोग तपासणी, गरोदर महिलांसाठी प्रसूतीपूर्व तपासणी, लसीकरण सेवा, रक्त आणि हिमोग्लोबिन तपासणी, क्षयरोग तपासणी, मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया आणि लेप्टोस्पायरोसिस तपासणी, सिकसेल आजार व रक्तक्षय तपासणी अशा विविध आरोग्य सेवा देण्यात आल्या.

## २२५ महिलांनी घेतला लाभ

यावेळी सुमारे २२५ लाभार्थ्यांनी लाभ घेतला. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या शिबिरास मुख्य वैद्यकीय अधिकारी आनंद गोसावी, क्षयरोग अधिकारी उषा राठोड, वैद्यकीय अधिकारी सुरेश पंडित, भक्तराज भोईटे, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी भागातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारीही उपस्थित होते. गेल्या चार दिवसांपासून महापालिकेच्या वतीने सेवा संकल्प अभियान अंतर्गत चारही प्रभागांत आयोजित महिलांसाठी विशेष आरोग्य शिबिरांना महिलांचा मोठा प्रतिसाद लाभला. महिलांच्या रोजच्या दैनंदिन जीवनात येणाऱ्या आरोग्य तक्रारींचे निवारण व स्तन, गर्भाशय मुख कर्करोग तपासणी या शिबिरांमध्ये आयोजित केल्यामुळे महिलांनी महापालिकेचे आभार मानत समाधान व्यक्त केले.

# कामोठ्यामध्ये साकारले कोल्हापूरच्या अंबाबाईचे दिव्य रूप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भक्ती, श्रद्धा आणि संस्कृतीचा त्रिवेणी संगम असलेल्या कामोठ्याची आई माऊली नवरात्रोत्सवाला यंदा मोठ्या उत्साहात सुरुवात होणार आहे. युवा मित्र मंडळ व व्हॅल्यू ऑफ स्माईल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या भव्य नवरात्री उत्सवांतर्गत यंदा महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे आराध्य दैवत असलेल्या कोल्हापूरच्या करवीर निवासिनी श्री अंबाबाई मातेचे दिव्य आणि आकर्षक रूप साकारण्यात आले आहे.

या देखाव्याचे उदघाट्न भाजपचे प्रदेश चिटणीस तथा आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. या भव्यदिव्य सोहळ्यामुळे संपूर्ण कामोठे परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला असून कामोठेकरांना आपल्याच परिसरात श्री अंबाबाई मातेच्या दिव्य स्वरूपाचे दर्शन घेण्याची पर्वणी उपलब्ध झाली आहे.

यावेळी प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, नगरसेवक अमर पाटील, हॅप्पी सिंग, विकास घरत, सुमित झुंझारराव, समाजसेवक भाऊ भगत, विनोद खेडेकर, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, हर्षवर्धन पाटील, हरजिंदर कौर, सतीश पाटील, युवा मोर्चा कामोठे अध्यक्ष तेजस जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.



# फडके नाट्यगृहात गीतरामायणाचा अनोखा नृत्याविष्कार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात ७ ऑक्टोबर रोजी गीतरामायण भरतनाट्यम नृत्यानुभव नृत्यनाटिकेचा भव्य व प्रेरणादायी कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. इनरव्हील क्लब ऑफ पनवेल डिस्ट्रिक्ट ३१३ यांच्या वतीने क्लबच्या निधी संकलनासाठी व महत्त्वपूर्ण सामाजिक कार्याला हातभार लावण्यासाठी या विशेष सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

सौदामिनी प्रॉडक्शन्स प्रस्तुत ही नृत्यनाटिका मराठी रसिकांच्या मनावर राज्य करणाऱ्या कविवर्य स्वर्गीय ग. दि. माडगूळकर व संगीतकार स्वर्गीय सुधीर फडके यांच्या अजरामर मूळ संगीतावर आधारित होती. भरतनाट्यम नृत्याच्या पारंपरिक व नयनरम्य शैलीतून साकारलेल्या या नृत्यप्रयोगाने आणि कलाकारांच्या भावपूर्ण तसेच उत्कृष्ट सादरीकरणाने उपस्थित रसिकांची मने जिंकली. संगीताच्या तालावर व नृत्याच्या मुद्रेवर नटलेली रामकथा उपस्थितांसाठी एक अविस्मरणीय पर्वणी ठरली.

संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी व नियोजनासाठी क्लबच्या अध्यक्षा डॉ. अमृता नाईक, सचिव निशिगंधा पाटील, उपाध्यक्ष मीनल टिपणीस, प्रोजेक्ट हेड स्वाती जोशी, खजिनदार पूर्णिमा हळदीपूरकर, उर्वी पोतदार, अक्षता खोत आणि डॉ. शोभना पालेकर तसेच वर्षा ठाकूर यांच्यासह सर्व सदस्यांचे विशेष व मोलाचे योगदान लाभले. या सर्वांच्या परिश्रमांमुळेच सोहळा अत्यंत नेटका पार पडला. या दिमाखदार सांस्कृतिक कार्यक्रमाला पनवेल व परिसरातील रसिकांचा अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या यशस्वी उपक्रमामुळे इनरव्हील क्लबच्या सामाजिक उपक्रमांना आणखी बळ मिळणार असून रसिकांच्या मनात या सोहळ्याची गोड आठवण कायम राहील.

सोहळ्यासाठी इनरव्हील क्लब डिस्ट्रिक्ट ३१३च्या डिस्ट्रिक्ट व्हाइस चेअरमन अपर्णा प्रधान तसेच डिस्ट्रिक्ट एडिटर सारिका धोत्रे यांची विशेष उपस्थिती होती. सीकेटी विद्यालय, बांठिया विद्यालय, फडके विद्यालय व बालग्राम येथील ९० विद्यार्थ्यांना विनामूल्य कार्यक्रम इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे दाखवण्यात आला. मुलांनी अतिशय उत्साहाने कार्यक्रमाचा आनंद घेतला. पनवेलमधील अनेक मान्यवर डॉक्टर, वकील, बिल्डर यांनी कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थिती लावली होती. हा कार्यक्रम सर्वांना अतिशय आवडला व असेच दर्जेदार प्रयोग फक्त पुणे, मुंबईकरिता न होता पनवेलमध्येही सादर होत राहावेत, अशी इच्छा सर्वांनी व्यक्त केली.

# राष्ट्रीय टपाल दिनानिमित्त ‘सीकेटी’त टपाल सेवकांचा सन्मान




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय टपाल दिनानिमित्त सीकेटी इंग्रजी माध्यम शाळेत हिरवा कुल (ग्रीन हाऊस) तर्फे टपाल सेवकांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या कार्यक्रमासाठी नवीन पनवेल टपाल विभागातर्फे प्रकाश भिलारे, राकेश रुईकर, सचिन पाटील हे टपाल सेवक तसेच विद्यालयाच्या पर्यवेक्षिका नीरजा अदुरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

भारतात दरवर्षी १० ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय टपाल दिन साजरा केला जातो. भारतातील टपाल विभागाच्या १५० वर्षांहून अधिक काळातील योगदानाचा आणि सेवांचा सन्मान करण्यासाठी हा दिवस ओळखला जातो. तसेच ९ ते १५ ऑक्टोबर या कालावधीत 'राष्ट्रीय टपाल सप्ताह' साजरा केला जातो. या कार्यक्रमावेळी विद्यार्थ्यांनी "मामाचे पत्र हरवले" हा खेळ सादर केला. तसेच इयत्ता पाचवीच्या चिन्मयने "पत्रास कारण की..." या माध्यमातून सामाजिक संदेश दिला. यावेळी टपाल सेवक प्रकाश भिलारे, सचिन पाटील यांनी मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यालयाच्या पर्यवेक्षिका नीरजा अदुरी यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय टपाल सेवेविषयी माहिती सांगितली व टपाल सेवकांप्रति कृतज्ञता व्यक्त करीत आभार मानले. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका स्वाती काळे तसेच हिरवा कुल प्रमुख प्रगती जाधव, सदस्य प्राची इसे, मनीषा पाटील, महेश पोपेटा, रुपेश मढवी, स्नेहल जाधव यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राची इसे यांनी केले. टपाल सेवकांना विद्यार्थ्यांनी बनविलेले शुभेच्छा कार्ड देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

# भिंगारी-कांदेवाडीत ग्रामस्थांची सतर्कता; तीन संशयितांना पिटाळले





**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील भिंगारी-कांदेवाडी परिसरात चारचाकी वाहनातून आलेल्या तीन संशयित व्यक्तींना ग्रामस्थांनी जाब विचारत परिसरातून जाण्यास भाग पाडले. त्यांच्या संशयास्पद हालचालींमुळे ग्रामस्थांनी सतर्कता दाखविल्याने संभाव्य अनुचित प्रकार टळल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार संबंधित तीन व्यक्ती एका चारचाकी वाहनातून गावात दाखल झाल्या होत्या. त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने ग्रामस्थांनी त्यांना थांबवून गावात येण्याचे कारण विचारले. मात्र, त्यांनी समाधानकारक उत्तरे न दिल्याने ग्रामस्थांचा संशय अधिक बळावला. त्यानंतर ग्रामस्थांनी त्यांना जाब विचारत परिसरातून निघून जाण्यास सांगितले. अखेर या व्यक्तींनी तेथून काढता पाय घेतला. या घटनेनंतर ग्रामस्थांनी परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

गावात अनोळखी व्यक्ती किंवा संशयास्पद वाहन आढळल्यास सावध राहावे तसेच लहान मुलांकडे विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. संशयास्पद व्यक्ती आढळल्यास स्वतःहून कायदा हातात न घेता तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, संबंधित व्यक्ती नेमक्या कोणत्या कारणासाठी गावात आल्या होत्या याबाबत अधिकृत माहिती समोर आली नाही.

# पनवेलची अहाना सोमण झोमॅटोच्या जाहिरातीत



**पनवेल : वार्ताहर**

पनवेलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. पनवेलची बालकलाकार अहाना केदार सोमण हिची लोकप्रिय फूड डिलिव्हरी प्लॅटफॉर्म झोमॅटोच्या जाहिरातीसाठी निवड झाली असून तिची जाहिरात नुकतीच प्रदर्शित झाली आहे. अहानासाठी जाहिरातीतील कामाचा अनुभव नवीन होता, मात्र या संधीचा तिने सहजतेने सामना केला.

चित्रीकरणादरम्यान दाखवलेला आत्मविश्वास आणि संयम यामुळे तिच्या कुटुंबीयांसाठी हा अनुभव विशेष ठरला. लहान वयातच अभिनय क्षेत्रात मिळालेली ही संधी तिच्या पुढील वाटचालीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अहानाच्या या प्रवासात तिचे वडील केदार सोमण यांच्यासह प्रशिक्षक अद्‌वैत शेंबवणेकर, रविकांत काळे, सई सोमण तसेच कुटुंबीय आणि मित्रपरिवाराचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि प्रोत्साहनामुळे अहानाला ही संधी आत्मविश्वासाने स्वीकारता आली.

दरम्यान, झोमॅटोच्या जाहिरातीच्या माध्यमातून अहानाला व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहचण्याची संधी मिळाली आहे. तिच्या या यशामुळे पनवेलच्या कलाक्षेत्रातील युवा प्रतिभेची पुन्हा एकदा चर्चा होत असून अहानाच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# मारहाणप्रकरणी गुन्हा दाखल

**नवीन पनवेल** : पाण्याच्या वादातून लाकडी फळीने मारहाण केल्याप्रकरणी दोघांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ ऑक्टोबर रोजी जयराम तुकाराम पाटील आणि स्वप्निल जयराम पाटील यांनी त्यांच्या पाण्याच्या नळाला प्रेशर मोटर लावून पाणी भरल्याने राजेंद्र तुकाराम पाटील (५४, रा. सांगडे) यांच्याकडे पाणी येत नव्हते. याचा जाब विचारला असता रागाच्या भरात दोघांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच जयराम पाटील यांनी लाकडी फळी राजेंद्र यांच्या डोक्यात मारून जखमी केले.

# अॅल्युमिनियमच्या शिड्यांची चोरी

**नवीन पनवेल** : दुकानाबाहेर उभ्या केलेल्या अॅल्युमिनियमच्या शिड्या चोरून नेल्याप्रकरणी अज्ञाताविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सादिक हुसेन शेख यांच्या अल सलार कॅफे, तळोजा सेक्टर १६, फेज २ या दुकानाबाहेर उभ्या केलेल्या १६ हजार रुपये किमतीच्या दोन शिड्या २७ सप्टेंबर रोजी चोरीला गेल्या. याप्रकरणी ९ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कर्नाळा खिंडीत कारला भीषण आग; मोठी दुर्घटना टळली



**पनवेल : वार्ताहर**

मुंबई-गोवा महामार्गावरील कर्नाळा खिंड परिसरात धावत्या किया कारेन्स कारला अचानक भीषण आग लागली. या आगीत कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. घटनेमुळे महामार्गावरील वाहतुकीवर काही काळ परिणाम झाला. एमएच ४६ सीव्ही ४५७२ क्रमांकाच्या कारला अचानक आग लागल्याचे लक्षात येताच परिसरात खळबळ उडाली.

माहिती मिळताच पनवेल महानगरपालिका अग्निशमन दलाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जवानांनी पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळवले. अग्निशमन दलाच्या तत्पर कारवाईमुळे आग पसरण्याचा धोका टळला. बचावकार्यात तांडेल शिवा आडे यांच्या नेतृत्वाखाली यंत्रचालक राहुल सोनावले व केतन जगताप तसेच फायरमन अमर घरत, तेजेश घरत, शुभम मानेकर व एकनाथ बागुल यांनी सहभाग घेतला. कारला आग लागण्याचे नेमके कारण स्पष्ट झाले नाही. कारचे मोठे नुकसान झाले असून अग्निशमनच्या कारवाईमुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली.



**पनवेल : अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे झालेल्या नवव्या इंटरनॅशनल कराटे चॅम्पियन २०२६-आशिया कप चॅम्पियनशिप स्पर्धेत पार्थ नारायण लाळे याने ओपन अंडर-१९ गटात सुवर्ण आणि कांस्यपदक पटकावले. याबद्दल महापालिकेचे माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी त्याचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# अमिताभ बच्चन 'न दिसलेला, न पाहिलेला'



**झूम प्रहर**

दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

आज ११ ऑक्टोबर २०२६ शहेनशहा अमिताभ बच्चनचा ८४वा वाढदिवस आणि या वयातही कार्यरत. या अष्टपैलू कलाकाराला थांबणं अजिबात मंजूर नाही. आजही अमिताभ बच्चन एक्सवर (अर्थात ट्विटरवर) कार्यरत आहे. काळासोबत बदलणं म्हणजे काय हे अमिताभ बच्चनकडून शिकावं. आपल्या कारकिर्दीत अमिताभ बच्चनने अनेक चढउतार अनुभवले, आणि त्यातून आपला मार्गही काढला. विशेषतः नवीन पिढीतील पटकथा आणि संवाद लेखक आणि दिग्दर्शक यांच्या चित्रपटांतून भूमिका साकारत त्यांनी स्वतःला छान अपडेट ठेवले. कौन बनेगा करोडपती हा खेळ तब्बल पंचवीस वर्षे सुरू आहे, त्यावरची आपली मुद्रा त्यांनी कायम ठेवली आहे. अशा या अमिताभ बच्चनची आणखी एक बाजू आहे. कधीच न दिसलेली. कधीच न पाहता आलेली अशी ती आहे. आजच्या वाढदिवसानिमित्त ती पाहूया. आजच्या ग्लोबल युगातील जेन झी आणि जेन अल्फा पिढीलाही त्याबाबत उत्सुकता वाटेल.

आता तुम्हीच सांगा, अमिताभ बच्चनची भूमिका असलेला 'यार मेरी जिंदगी' नावाचा 'पिक्चर' माहित आहे का? अमिताभ बच्चनच्या चित्रपटांची नावे हा वेगळा विषय आहे. लगेच गुगल सर्च करु नका आणि जरी केलेत तरी 'त्यामागची स्टोरी' माहित पडणार नाही. या गोष्टीला बॅक स्टोरी असेही म्हणतात. नव्वदच्या दशकाच्या सुरुवातीची गोष्ट. त्या दिवसात हिंदी चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळेस आम्हा सिनेपत्रकारांना मुंबईत झालेच पण डलहौसीपासून चैन्नईपर्यंत ( तेव्हाचे मद्रास) 'पिक्चरच्या सेटवर शूटिंग रिपोर्टींग' साठी घेऊन जात असत. तेथील 'ऑखो देखा हाल' आम्ही लिहायचा इतका व असा तो 'सोपा पेपर' असे. गृहपाठ, पाठांतर अशी काहीच कटकट नसे. 'जे दिसेल ते क्रिकेट सामन्याच्या समालोचनासारखे लिहायचं' (वाढवून, शिजवून, खुलवून, रंगवून लिहिलं तरी चाले. चित्रपटाच्या जगासारखेच ते होते.) तेव्हाचा वाचक तेच जास्त वाचायला उत्सुक असे. या सदराच्या 'ऐसपैस जागे'वरुनच ते दिसून येई. अशातच एके दिवशी जुहूच्या एका बंगल्यात अमिताभ, शत्रुघ्न सिन्हा, शारदा यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या 'यार मेरी जिंदगी'च्या सेटवर येण्याचे आमंत्रण हाती आले. अमिताभने मीडियावरचा 'बॅन' उठवून आणि सविस्तर मुलाखती देण्याला सुरुवात करुन एक दीड वर्ष झालं असेल म्हणून वेळेपूर्वीच सेटवर पोहचलो. (ऐंशीच्या दशकात बराच काळ अमिताभ बच्चन फिल्मी पत्रकारितेवर खफा होता. फक्त आणि फक्त त्याच्या नवीन चित्रपटाच्या मुहूर्ताला त्याचं दर्शन घडे. हा स्वानुभव आहे.)

'सेटवरचा अमिताभ' यावर 'लक्ष्य' कायम राहिल असा ॲन्गल पकडला. सेटवर आणखीन चार-पाच सिनेपत्रकार व काही फोटोग्राफर होते. सगळेच बच्चनसाहेब कधी येणार याकडे 'डोळे' लावून होतो. दिग्दर्शक अशोक गुप्ता सुधाचंद्रनवर काही दृश्ये चित्रीत करीत होता. ती तेव्हा पार्ल्यात राहत असल्याने मराठी बरं बोलायची. पण या 'अवांतर गोष्टी' यावेळी महत्वाच्या नव्हत्या. एकच लक्ष्य अमिताभ बच्चन. आणि ते स्वाभाविक होतेच. तासाभराने 'कॅमेऱ्याच्या मागची' गोष्ट समजली. ती जास्त रंजक असते. या चित्रपटाचा मुहूर्त १९७१ साली राजेश खन्नाच्या हस्ते झाला होता आणि दिग्दर्शन मुकुल दत्त करीत होता. (जे. ओम प्रकाश निर्मित राजेश खन्ना व आशा पारेख यांच्या भूमिका असलेल्या 'आन मिलो सजना'चे दिग्दर्शन तेव्हा मुकुल दत्त करीत असल्यानेच राजेश खन्ना मुहूर्त क्लॅप द्यायला आला.जेवढे मागं जावं तेवढं वेगळं काही समजतं.) याच मुकुल दत्त दिग्दर्शित 'रास्ते का पत्थर' (१९७२) अमिताभ व शत्रुघ्न सिन्हाच होते. तो प्रदर्शित झाला, फ्लॉपही झाला. पण या 'यार मेरी जिंदगी'चे काय? काही रिळांचे शूटिंग होईपर्यंत प्रकाश मेहरा दिग्दर्शित 'जंजीर' (१९७३) आला आणि एका सूडनायकाचा जन्म झाला. अमिताभ आता 'वरच्या वर्गात' आला होता. एक नवीन इतिहास घडत होता. अगोदर 'साईन' केलेल्या चित्रपटांकडे त्याचे दुर्लक्ष झालं (की केलं? सिनेमाच्या जगात कधी, कुठे, का, कशाला, केव्हा, किती लक्ष द्यायचं न द्यायचं हे परिस्थिती शिकवते. तो खेळही जमावा लागतो. चित्रपट अभ्यासक्रमात याचीही दखल हवी असं वाटतं का?

पिक्चर मागे पडतयं म्हणून मुकुल दत्तने दिग्दर्शन सोडले. व्यावसायिक रणनीती म्हणायची का? अशोक गुप्ताने ते दिग्दर्शन स्वीकारले. चित्रीत झालेला 'अधला मधला' भाग पाहिला. (चित्रपट असाच तर बनत असतो. चित्रीकरणाची एक पटकथा असते. त्याला स्टोरी बोर्ड म्हणतात.) तो वापरुन पटकथेत जमेल तसे फेरफार करुन आणि आता पुढील पिढीतील कलाकार घेऊन हा चित्रपट पूर्ण करण्याचे पाऊल तर टाकले पण ते पडद्यावर कधी पडले माहित्येय? एक मोठा प्रवास आहे. चक्क २००८ साली हा चित्रपट प्रदर्शित झाला. तो कोणी पाहिला ते माहित नाही. आणि पाह्यचा तर कशाला ? भलेही या चित्रपटाच्या जाहिरातीत अमिताभ बच्चन आणि शत्रुघ्न सिन्हा यांची नावे असतील. म्हणून काय वाटेल ते पाहायचं?

खूपच मोठा वळणावळणाचा प्रवास करत करत, थांबत थांबत हा चित्रपट एकदाचा प्रदर्शित तरी झाला. पण तुम्हालाही कल्पना असेल 'पडद्यावर येणाऱ्या चित्रपटांपेक्षा काही ना काही कारणास्तव कायमच्या डब्यात जाणाऱ्या चित्रपटांची संख्या जास्त आहे.'तो' न घडलेला खूपच मोठा इतिहास आहे. त्यावर डिजिटल चॅनेलवर एक माहिती आणि मनोरंजनाचा खेळ दाखवता येईल. अमिताभचे तर किमान पंचेचाळीस पन्नास चित्रपट असेच कुठेतरी घोषणेपासून चार सहा रिळांचे शूटिंग झालेय, अशा स्थळांवर कायमचे 'डब्यात' गेलेत. त्यातील काही चित्रपट पूर्ण होऊन पडद्यावर आले असते तर....आता तुम्ही म्हणाल, जर तरला काय अर्थ आहे?

अमिताभचे ही चित्रपट मध्येच बंद पडलेत हा 'रियॅलिटी शो' एव्हाना त्याने, चित्रपटसृष्टीने, मीडियाने आणि त्याच्या चाहत्यांनी स्वीकारलंय आणि हे सतत होत राहिलयं. खुद्द अमिताभ बच्चनला यातील अनेक चित्रपटांची आठवणही नसेल. हादेखील एक खेळाचा भाग आहे. विसरायचं आणि पुढे जायचं हीच अस्सल व्यावसायिकता आहे आणि अमिताभ बच्चनचा सर्वात मोठा गुण म्हणजे काटेकोर व्यावसायिकता. १९७३ साली देवेन वर्मा दिग्दर्शित 'नाम बडे' या चित्रपटात अमिताभ व रेखा राव अशी जोडी होती. ही रेखा राव म्हणजे, 'प्रेम करुया खुल्लम खुल्ला', 'घाबरायचं नाही' इत्यादी मराठी चित्रपटातून आपण तिला पाहिलं. बालकलाकार म्हणून तिने 'जिगरी दोस्त' वगैरत काम करत असतानाच ती वयात येत असतानाच तिला 'नाम बडे' हा चित्रपट मिळाला. पण १९७३च्या मे महिन्यात 'जंजीर', जून महिन्यात 'अभिमान', ऑक्टोबर महिन्यात 'सौदागर', नोव्हेंबर महिन्यात 'नमक हराम' प्रदर्शित झाले आणि अमिताभच्या कुंडलीतील ग्रह उच्च झाले. अमिताभ भोवतीचे वातावरण बदलले. नरेंद्र बेदीने 'बदलत्या वातावरणा'चा वेळीच फायदा उठवण्यासाठी 'बेनाम'च्या शूटिंगची गती वाढवली. चित्रपटाच्या जगात यशाची भाषा, नाणे जास्त चालते. आणि 'सतत पुढे पाहणे' व्यावसायिकदृष्ट्या जास्त आवश्यक असते हे बुद्धिमान अमिताभला कशाला कोणी सांगायला हवे? आणि यशासाठी बरीच 'प्रतिक्षा' केल्यावर तर तो अधिकाधिक "फोकस्ड" होणारच.

अमिताभच्या मागे यश लागले तसे त्याचे मृणाल सेन दिग्दर्शित 'गोतंत्र' ( केवळ आणि केवळ मृणाल सेनसाठी हा चित्रपट पडद्यावर यायला हवा होता), हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'एक था चंदर एक थी सुधा' (यात जया भादुरी त्याची नायिका होती) हे केव्हा बंद झाले हे समजलेच नाही. आता देवेन वर्मालाही अमिताभच्या 'डेट्स प्रॉब्लेम'चा अडथळा येऊ लागला. त्याने 'नाम बडे' नाव बदलून 'पतझड' केले. तरी शूटिंग पुढे जाईना. अखेर त्याने 'पतझड' गुंडाळला आणि शर्मिला टागोरला अमिताभची नायिका म्हणून निवडून 'बेशरम' या नावाचा चित्रपट निर्माण करण्याचे पाऊल टाकले. तोही रखडत रखडत प्रदर्शित झाला तेव्हा अमिताभ 'सुपरस्टार' होता. बिचारी रेखा राव आजही आपल्या नशिबाला दोष देतेय. याच चित्रपटाचे फोटो तिला मी पाठवले तेवढेच तिला बंगलोर मुक्कामी समाधान.





अमिताभच्या 'बंद पडलेल्या काही चित्रपटांच्या आठवणी सांगायलाच हव्यात. दिलीपकुमारला एकदा नव्हे, तर 'विधाता', 'कर्मा' आणि 'सौदागर' असे तिनदा दिग्दर्शित करणारे सुभाष घईंच्या दिग्दर्शनात किमान एकदा का असेना पण अमिताभ बच्चन पाहणे खूपच इंटरेस्टींग ठरले असते.(ही भाबडी समजूत नसावी. हा घईवरचा विश्वास?) बीग बिने तब्बल तीन चार पिढीतील अनेक प्रकारच्या/क्षमतेच्या/शैलीच्या/मानसिकतेच्या दिग्दर्शकांच्या चित्रपटातून भूमिका साकारलीय. त्यात गुलजार, श्याम बेनेगल, एन. चंद्रा, राकेश रोशन, शेखर कपूर, फिरोझ खान अशा काही दिग्दर्शकांना तो योग आला नाही. राकेश रोशनच्या दिग्दर्शनात बीग बी 'किंग अंकल' साकारणार याची चर्चा फार फार रंगली. प्रत्यक्षात जॅकी श्रॉफने ती भूमिका साकारली. सुभाष घई दिग्दर्शित 'देवा' (१९८७) च्या मुहूर्ताचे आमंत्रण हाती आले तेव्हा त्यातील 'ड्रेस कोड-सूट' हे वाचून गोंधळलो. माझ्यासारख्या गिरगावातील चाळीत राहणाऱ्या मध्यमवर्गीय सिनेपत्रकाराकडे सूट तो कसा असेल? कपाटात जागा नाही म्हणून आम्ही अंगावर कपडे ठेवत असू. मला आठवतंय, रेल्वेस्थानकावर स्वस्तात बूट पॉलिश करुन मिळतात हे लक्षात ठेवून चर्नी रोड गाठले होते. अंधेरीच्या एका पंचतारांकित हॉटेलमधील ती रात्र चक्क शिस्तबद्ध मुहूर्ताची ठरली. फिल्मी मुहूर्तात नेहमीच असतो तसा गडबड गोंधळ, बारवरचा आवाज नव्हता. सारा कसा 'साहेबी' थाट होता.

एका शोमनच्या फिल्ममध्ये महानायक भूमिका करीत होता ना? गंमत म्हणजे, नायिकेची निवड न करताच फिल्मीस्तान स्टुडिओत 'देवा'चे पहिले चित्रीकरण सत्र सुरु तर झाले, पण 'सेटवर पत्रकार, पाहुणे यांना प्रवेश नाही' असा दरवाजावरचा फलक वाचून निराशा झाली. 'देवा'च्या रुपातील बीग बीचा खास ड्रेस 'लीक' होऊ नये म्हणून ही काळजी होती म्हणे. काही दिवसांनी धक्कादायक बातमी आली. सुभाष घईने पहिलेच चित्रीकरण सत्र पूर्ण व्हायच्या आतच 'देवा' डब्यात ठेवून 'राम लखन'ची निर्मिती करायचे ठरवलयं. असेलही कदाचित. अमिताभ म्हटलं की रेखा आलीच. या जोडीच्या 'पडद्यावर न आलेल्या चित्रपटां'ची गंमत गोष्ट वेगळीच आहे. आता हेच बघा ना, गाणे एक अथवा सेम टू सेम. रेखादेखील एकच, पण हीरो मात्र दोन. बरं हे हीरो कोण हेही पाहायला हवे. पहिला अमिताभ बच्चन आणि दुसरा संजय खान. नेमका संदर्भ काय असा तुमचा प्रश्न असेलही. अमिताभ व संजय खान एकाही चित्रपटात एकत्र आले नाहीत.









अमिताभचे ते सुरुवातीचे दिवस. तो आहे म्हणजे हमखास पिक्चर फ्लॉप हे कोणाही ज्योतिषाने कुंडली न मांडताही घडत होते. त्याला कसेबसे पिक्चर्स मिळत होते. अशाच 'पडत्या काळात' अमिताभला निर्माता व दिग्दर्शक कुंदन कुमारने साईन केले. जोडीला नायिका रेखा. 'दुनिया का मेला'चे शूटिंग सुरु झाले. चांदिवली स्टुडिओत प्रेम गीताचे शूटिंग ठरले. गाण्याचे बोल, ये चेहरा ये जुल्फे जादू सा कर रहे है

तौबा तौबा... अमिताभ व रेखा यांनी 'प्रेमाचा अभिनय वठवून' हे गाणे साकारले. दोन अडीच महिन्यांनी याच चांदिवली स्टुडिओत याच पिक्चरचे आणखीन एक शूटिंग सत्र असल्याने रेखा स्टुडिओत पोहचली तेव्हा तिला 'आज संजय खानसोबत शूटिंग आहे' हे समजल्याने आश्चर्याचा फारसा धक्का बसला नाही. तोपर्यंत तरी 'मी पटकथा वाचून पिक्चर साईन करते' अशा पोझिशनला ती आली नव्हती. पण आज संजय खानसोबत 'ये चेहरा ये जुल्फे तौबा तौबा' याच गाण्यावर 'प्रेमाचा अभिनय' करायचाय हे समजताच ती दचकली. आपला हीरो बदललाय हे तिच्या लक्षात आले. 'दुनिया का मेला' निर्मितीवस्थेत असताना रेखा बिझी होत गेली आणि चित्रपट रखडत राहिला आणि तो कधी पडद्यावर यावा? तोपर्यंत १९७४ साल उजाडले होते. अमिताभ युग सुरु झाले होते. तोपर्यंत गल्ली गल्लीत बातमी पोहचली होती, याच 'दुनिया का मेला'मधून अमिताभला काढले आणि संजय खानला घेतले.

अमिताभ व रेखावरच्या त्या गाण्याचे पुढे काय झाले? आता यू ट्यूबचे युग आले आणि हे सेम गाणे अमिताभ व रेखा आणि संजय खान व रेखा या दोघांवरचे गाणे त्यावर उपलब्ध झाले आहे. बघा तर हे दुर्मिळ गाणे. सुरुवातीच्या संघर्षाच्या काळातच अमिताभला विश्वजीतने 'रॉकी' नावाच्या सिनेमासाठी साईन केला होता. या "विश्वजीतची रेखा" त्याची एक फेवरेट हिरोईन होती.

रेखाला विश्वजीतने रॉकीमध्ये अमिताभची नायिका म्हणूनच साइन गेलं. ट्रेड पेपरमध्ये जाहिरातही आली. पण विश्वजीतचा त्यावेळेला अतिशय पडता काळ असल्याने आणि त्याने त्यानंतर अभिनयापेक्षा जास्त लक्ष हेमंत कुमारने आपल्यासाठी जी रुपेरी पडद्यावर गाणी गायली ती गाणी आपण गात गात नवा आर्केस्ट्रा त्याने सुरु केला आणि त्याचा गायक म्हणून उदय झाला. त्यामध्ये 'रॉकी' दुर्दैवाने बंद. अरेरे. अलिकडेच काही वर्षांपूर्वी एका पार्टीमध्ये माझी विश्वजीतची भेट झाली असता त्याला माझ्याकडे "रॉकी"ची असलेली जाहिरात आवर्जून दाखवताच तो अगदी थक्क झाला. माझ्याकडे कलेक्शनमध्ये अशा पद्धतीची एक पन्नास बावन्न वर्षांपूर्वीची एखाद्या चित्रपटाची जाहिरात असणं हा त्याच्यासाठी एक प्रकारचा "कल्चरल शॉक" होता. विश्वजीत म्हणाला, मी इम्पात नाव रजिस्टर केले होतं. परंतु चित्रपट बनू शकला नाही. कालांतराने सुनील दत्त यांनी माझ्याकडून आपल्या अजंठा आर्ट्सर्ससाठी 'रॉकी' नाव घेतलं आणि संजय दत्तला 'रॉकी'च्या रुपात रुपेरी पडद्यावर आणले.

अमिताभ व रेखाचा असाच एक चित्रपट निर्माता व दिग्दर्शक कुंदनकुमार याचाच 'अपना पराया'. हा चित्रपट घोषणेवरच थांबला.

दिग्दर्शक राकेश कुमार हा तसा अमिताभ बच्चनच्या मर्जीतील. राकेशकुमारने चित्रपट जाहीर केला "टायगर". बच्चनच्या 'सूडनायक' इमेजला परफेक्ट नाव. नायिका रेखा. अमिताभ कमालीचा बिझी असल्याने 'टायगर'साठी तारखाच मिळत नव्हत्या. असा उशीर होत असतानाच मनमोहन देसाई दिग्दर्शित 'कुली'च्या बंगलोर येथील सेटवर अमिताभला अपघात झाला आणि त्याच्या एकूणच वाटचालीचे शेड्यूल बिघडलं आणि त्याच्यामध्ये 'टायगर' चित्रपट दुर्दैवाने घोषणेपुरताच राहिला. टीनू आनंद दिग्दर्शित "शिनाख्त"च्या (म्हणजे तपास, पोलीस तपास) मुहूर्ताचे आमंत्रण माझ्या हाती येताच यात अमिताभची नायिका कोण बरे यावर पटकन नजर जाणारच. १९८८ चे अखेरचे दिवस होते आणि माधुरी दीक्षित नाव वाचून अर्थात आनंद झाला. आर. के. स्टुडिओत संध्याकाळी हा मुहूर्त सोहळा रंगला. सेटवर पाऊल टाकताच मालगाडीचा सेट दिसला. मुहूर्ताच्या दृश्यासाठी असा सेट असल्याने कुतूहल वाढले. पटकथा लेखक आणि पत्रकार वसंत साठे यांनी मुहूर्ताचा क्लॅप देताच सेटवर शांतता पसरली. त्या मालगाडीत जखमी अवस्थेतील आणि अंगावर रक्त सांडलेल्या अमिताभला साखळदंडाने बांधलयं आणि गाडी वेगाने धावतेय असे दृश्य होते (वेगाचा फिल अर्थात ट्रीक सीन) आणि अशातच माधुरी येते, अमिताभला भावतिरेगाने मिठी मारते आणि त्याला समजावत म्हणते, आपण अतिशय निर्धाराने गुन्हेगारांचा पाडाव करु वगैरे वगैरे बरेच काही. या चित्रपटाची दुसरी नायिका माधवीदेखील फोटोसाठी आली. रजनीकांत आला.

अमिताभसोबत चित्रपट मिळाल्याने माधुरी प्रचंड खुश होती. एक तर तिच्या करियरचा हा पहिलाच टप्पा होता आणि अमिताभ नायक म्हणून लाभणे हे जणू आयुष्यातील सर्वात सुंदर स्वप्न पूर्ण होण्यासारखे होते. या सेटवरच माधुरीला भेटलो असता तिचा एकूणच फिल गुड काय बोलू नि किती बोलू असाच होता. अहो, तिचा कायमच हसरा चेहरा इतकं आणि असे काही बोलत होता की ते भाव आजही माझ्या डोळ्यासमोर आहेत, पण अमिताभच्या अनेक चित्रपटांप्रमाणेच हा 'शिनाख्त'ही मुहूर्तानंतर काही दिवसातच कायमचा बंद पडला. इंद्रकुमार दिग्दर्शित 'रिश्ता' ( १९९४) या नावाचा एक चित्रपट बनणार होता. अंधेरीतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये एका भव्य पार्टीत याचे आयोजन करण्यात आले होते. अमिताभ, माधुरी आणि आमिर खान अशी स्टार कास्ट. तोपर्यंत माधुरी हिंदी चित्रपटसृष्टीतील नंबर वनची अभिनेत्री बनली होती. अमिताभसोबत चित्रपट म्हणजे आमिरलाही सही मौका होता आणि काही दिवसांनी बातमी आली की हा चित्रपट मुहूर्तालाच बंद पडला. एकदा ट्रेड पेपरमध्ये बातमी आली, यश चोप्रा दिग्दर्शित एका नाव न ठरलेल्या चित्रपटात अमिताभ व माधुरी पती पत्नीच्या भूमिकेत आणि अभिषेक बच्चन त्यांच्या मुलाच्या भूमिकेत.... बातमी चांगलीच होती. अशी कुजबुज सुरु झाली की अभिषेकच्या आईची भूमिका साकारण्याइतपत आपण मोठ्या झालो आहोत असे माधुरीला वाटत नव्हते.

ऐंशीच्या दशकाच्या अखेरीस अंधेरीतील नटराज स्टुडिओत मी रिपोर्टींगसाठी सेटवर गेलो तेव्हाचे दोन चित्रपट आजही आठवताहेत. एक होता, जे. पी. दत्ता दिग्दर्शित 'बंधुआ' (त्यात वहिदा रेहमान नायिका). धर्मेंद्रने मुहूर्त क्लॅप दिला होता. दुसरा होता रमेश सिप्पी दिग्दर्शित 'राम की सीता श्याम की गीता, विशेष उल्लेखनीय गोष्ट या चित्रपटात अमिताभ व श्रीदेवी या दोघांचीही दुहेरी भूमिका होती. आणि आपल्या अजय वढावकरला मुहूर्त दृश्यात संधी मिळाल्याने तो केवढा तरी सुखावला होता. अनेक वर्ष तो या मुहूर्ताची आठवण काढायचा आणि भावूक व्हायचा. हे चित्रपट बंद पडले. नटराज स्टुडिओतच सत्तरच्या दशकात मुशीर रियाझ निर्मित आणि शक्ती सामंता दिग्दर्शित 'आरपार' या चित्रपटात दसऱ्याच्या दिवशी मुहूर्त झाला. शशी कपूर, अमिताभ, झीनत अमान व नीतू सिंग यांच्या भूमिका आणि राहुल देव बर्मनचे संगीत. चित्रपटाचे शूटिंगही सुरु झाले पण पुढे प्रगती नाही. मनमोहन देसाई व अमिताभ बच्चन ही दिग्दर्शक व अभिनेता सुपरहिट जोडी. सुभाष देसाई निर्मित 'सरफरोश' या जोडीचा असाच एक चित्रपट. अमिताभला वेगळाच गेटअप होता. ते फोटो पाहूनच इम्प्रेस व्हायला होई. परवीन बाबी नायिका होती. सहा सात रिळांच्या शूटिंगनंतर हाही चित्रपट बंद पडला. परवीन बाबी मानसिक शांततेसाठी अचानक विदेशात गेल्याचा या चित्रपटाला फटका बसल्याचे गॉसिप्स गाजले.

ऐंशीच्या दशकात एस. रामनाथन दिग्दर्शित 'रुद्र' या चित्रपटाच्या मुहूर्ताच्या आमंत्रणानुसार वांद्र्यातील मेहबूब स्टुडिओत पोहचलो ते थेट श्री शंकराच्या देवळाचा अतिशय उत्तम सेट लावला होता. अमिताभ देवाशी बोलतोय असा 'दीवार'च्या गाजलेल्या प्रसंगाची आठवण येत होती. बरेच दिवस या 'रुद्र'ची चर्चा होत राहिली इतकेच. हा चित्रपट बंद कधी पडला हे समजलेच नाही. मेहबूब स्टुडिओतच अमिताभ व मिथुन चक्रवर्ती यांच्यावर कंवल शर्मा दिग्दर्शित 'लव कुश' या चित्रपटाचा मुहूर्त झाला. पुढे काहीच नाही. चेतन आनंद दिग्दर्शित 'सलिम अनारकली' (अमिताभ, सलिम आणि प्रिया राजवंश अनारकली. आपण वाचलो म्हणूया का?), सुलतान अहमद दिग्दर्शित 'तू भी सच्चा मै भी सच्चा' (कल्याणजी आनंदजी यांचे संगीत होते), साधु संत (या चित्रपटात अमिताभसोबत मिथुन चक्रवर्ती व अमृता सिंग होते. पण पोस्टरवर दिग्दर्शकाचे नावच नाही. समजून जा काय ते). राजकुमार संतोषी दिग्दर्शित 'रणवीर' (मला आठवतंय विमानतळाजवळील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये अमिताभने आपल्या एकसष्टाव्या वाढदिवसानिमित्त हिंदी चित्रपटसृष्टी व मीडियासाठी जंगी पार्टी आयोजित केली होती. त्यात या चित्रपटाचा मुहूर्त झाला. अमिताभच्या जोडीला संजय दत्त व अभिषेक बच्चन होते.) राजकुमार संतोषी दिग्दर्शित 'द आऊटसायडर्स्' आणि 'पॉवर' हेदेखील चित्रपट बंद पडले. 'पॉवर'मध्ये अमिताभसोबत अनिल कपूर, संजय दत्त, अमिषा पटेल होते. यश चोप्रा निर्मित यशराज फिल्मचा प्राण मेहरा दिग्दर्शित 'जिंदगी के रंग' (अमिताभसोबत परवीन बाबी आणि पाहुणी कलाकार शर्मिला टागोर)चा परेलच्या राजकमल कलामंदिर स्टुडिओत अतिशय भव्य दिमाखदार मुहूर्त झाला.

चित्रपट पावपट होताच परवीन बाबी बेपत्ता होताच या चित्रपटाचा पत्ता कट. रमेश सिप्पी दिग्दर्शित 'आलिशान'चा जुहूच्या एका पंचतारांकित हॉटेलमध्ये उंची खाना पिनासह जोरदार मुहूर्त झाला. पुढे काहीच नाही. सुनील सिकंद दिग्दर्शित 'करिश्मा' चार रिळांनंतर बंद पडला. शशी कपूर, शर्मिला टागोर, अमिताभ, परवीन बाबी, डॅनी डेन्झोपा, इफ्तेखार यांच्या भूमिका होत्या. कादर खानने पटकथा, संवाद व दिग्दर्शन असे एकदम करीत अमिताभला 'कायर'ची शीर्षक भूमिका दिली. पण मनमोहन देसाई दिग्दर्शित 'कुली' (१९८३)च्या बंगलोर येथील सेटवरील जखमेने अमिताभला सहा महिने आराम करावा लागल्याने 'कायर' कागदावरच राहिला. राकेशकुमारचा 'शिवा' त्यात सापडलाच. त्यात नायिका परवीन बाबी आणि या सगळ्यात एकदम वेगळा चित्रपट ठरला असता 'पुराना पापी'. देव आनंद निर्मित, दिग्दर्शित व अभिनीत चित्रपटात अमिताभ बच्चन. पक्की व्यावसायिकता दाखवत अमिताभने हा चित्रपट स्वीकारला पण दुर्दैव.

याशिवाय 'चार्ली' (पद्मिनी कोल्हापूरे नायिका), राम तलवार निर्मित व चंद्रा बारोट दिग्दर्शित नाव न ठरलेला चित्रपट (झीनत अमान नायिका) वगैरे चित्रपट आहेत. खुद्द अमिताभला यातील किती चित्रपट आठवत असतील हा प्रश्न आहे. बीग बीचे दोन चित्रपट प्रदर्शनास सज्ज होऊनही पडद्यावर आलेच नाहीत. एस. रामनाथन दिग्दर्शित 'जमानत' आणि सूरजीत सरकार दिग्दर्शित 'Shoedite'. हा चित्रपट प्रदर्शित न झाल्याने अमिताभ फारच हळहळल्याचे वृत्त होते आणि असणारच. यात तो वृद्धाच्या भूमिकेत आहे. हा चित्रपट आता प्रदर्शित होत आहे अशी असलेली बातमी हा चित्रपट पडद्यावर आला तर खरी ठरेल.

---

# संगणक शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर

भारतातील परम या सुपर कॉम्प्युटरच्या बांधकामाची देखरेख करण्यासाठी प्रसिद्ध असलेले व भारतीय संगणक शास्त्रज्ञ, माहिती तंत्रज्ञानातील नेते आणि शिक्षणाचे वकील विजय पांडुरंग भटकर यांचा आज जन्मदिन आहे. भारत सरकारने त्यांना पद्मभूषण आणि पद्मश्री आणि महाराष्ट्र सरकारने त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान केलेला आहे.

डॉ. विजय भटकर यांचा जन्म ११ ऑक्टोबर १९४६ रोजी महाराष्ट्रात अकोला जिल्ह्यातील मुरांबा येथे झाला. मूर्तिजापूर येथील संत गाडगे महाराजांनी स्थापन केलेल्या शाळेत त्यांचे शिक्षण झाले. शालांत परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या डॉ. भाटकरांनी वयाच्या १८व्या वर्षी अभियांत्रिकी पदवी मिळवली. बडोद्याच्या महाराजा सयाजीराव विद्यापीठातून एमटेक केल्यानंतर ते दिल्लीच्या आयआयटीमध्ये दाखल झाले. वयाच्या अवघ्या २६व्या वर्षी त्यांनी डॉक्टरेट मिळवली. त्यांनी आयआयटी दिल्ली, नागपूर येथील सर विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि एमएस वडोदरा येथील विद्यापीठात अनुक्रमे १९६५मध्ये अभियांत्रिकी पदवी आणि १९६८मध्ये अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवी घेतली. पुण्यातील सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटिंगमध्ये डॉ. भाटकर यांनी १९८७मध्ये सुपर कॉम्प्युटर तयार करण्याच्या प्रकल्पावर देखरेख केली. यामुळे भारतातील पहिले सुपर कॉम्प्युटर, परम ८००० आणि परम १०००० तयार झाले.



डॉ. भटकर यांनी त्यांच्या इतर कर्तृत्वाव्यतिरिक्त ८०हून अधिक संशोधने लिहिली, संपादित केली आणि तयार केली. कॉम्प्युटर सायन्सच्या क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, दिल्लीच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे ते अध्यक्ष आहेत. याव्यतिरिक्त ते विज्ञान भारतीचे नेते आहेत. आयआयटी दिल्लीने त्यांना १९७२मध्ये अभियांत्रिकीमध्ये पीएचडी प्रदान केली. आयटी शिक्षण आणि संशोधन अधिक करण्यासाठी डॉ. भटकर यांनी आंतरराष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान संस्थेची स्थापना केली. या संस्थेत अध्यापनासह उच्च शिक्षण संशोधन सुविधांचे नियोजन करण्यात आले.

डॉ. भटकर यांनी लिहिलेल्या आणि संपादित केलेल्या बारा पुस्तकांचे प्रकाशन झाले आहे आणि त्यांनी ऐंशीहून अधिक संशोधनात्मक लेखही दिले आहेत. २०३०पर्यंत भटकरांच्या मते, भारत चीन आणि अमेरिका या दोघांनाही मागे टाकून जगातील आघाडीचे राष्ट्र बनणार आहे. राष्ट्राला सशक्त, दूरदर्शी प्रतिनिधित्व आणि त्यासाठी योग्य दिशा हवी आहे. रॉयल सोसायटीने २००३मध्ये शास्त्रज्ञांचा एक गट दक्षिण आफ्रिकेत पाठवला आणि विजय भटकर यांनी त्यांचे नेतृत्व केले.

संत गाडगे महाराजांचा आदर्श समोर ठेवून विज्ञान व अध्यात्माची सांगड घालत ते कार्यरत आहेत. संपूर्ण देशातील तीर्थक्षेत्रे 'ज्ञानतीर्थक्षेत्रे' व्हावीत यासाठी आळंदीपासून त्या स्वरूपाचे काम त्यांनी सुरू केले आहे. युरोपियन संस्कृतीचा अभ्यास करणारे तसेच आध्यात्मिक अनुभूतीसाठी ध्यानधारणा करणारे व आजही सक्षमतेने कार्यरत असलेले डॉ. विजय भटकर भारतीय युवकांचे आदर्श ठरले आहेत. (साभार इंटरनेट)

# रायगडमधील पावणेचार लाख मतदारांना एसआयआर नोटिसा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात करण्यात आलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणात (एसआयआर) तब्बल पावणे चार लाखांहून अधिक मतदारांना एसआयआरच्या नोटीसा प्राप्त झाल्या आहेत. ज्यात पनवेल मधील सर्वाधिक दीड लाख मतदारांचा समावेश आहे. मतदारांना कागदपत्र आणि पुराव्यांची जुळवाजुळव करतांना मतदारांची तारांबळ उडत आहे.

मतदार याद्यांच्या शुध्दीकरणासाठी देशभरात एसआयआर प्रक्रीया राबविली जात आहे. राज्यातही पहिल्या टप्प्यातील ही प्रक्रीया पार पडली. यात मतदारांची २००२ च्या मतदार यादीशी जोडणी आणि गणना प्रपत्र संकलन करण्यात आले. यानंतर प्रारुप यादी प्रसिध्द झाली. मात्र प्रारुप यादीत नावे यूेऊनही लाखो मतदारांना निवडणूक विभागाकडून नोटीसा देण्यात आल्या आहेत.

पनवेल विधानसभा मतदारसंघातील१ लाख ५० हजार ४२४ मतदारांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. कर्जत खालापूर मतदार संघातील ३३ हजार २९४, उरण मतदारसंघातील ५८ हजार ६९८, पेण मधील ३० हजार ३८१, अलिबाग मधील ४२ हजार ७४१, महाड मधील ४२ हजार ४३३, तर श्रीवर्धन मतदारसंघातील २४ हजार ८६० मतदारांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील एकूण ३ लाख ८२ हजार ८३१ मतदारांना या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यात २५ लाख ३३ हजार ७३९ मतदार होते, एसआयआर प्रक्रीयेनंतर ५ लाख ८४ हजार ११८ मतदारांची नावे वगळली गेली. त्यामळे १९ लाख ४९ हजार ३४१ मतदार शिल्लक राहीले . आता ३ लाख ८२ हजार ८३१ मतदारांना पुन्हा नोटीसा प्राप्त झाल्या आहे. यात प्रारूप यादीत नावे समाविष्ठ असलेल्यांचा समावेश आहे. त्यामुळे नोटीसा प्राप्त झालेले मतदार धास्तावले आहेत.

वडील आणि मुलांमधील वयाचे अंतर योग्य वाटत नाही, २००२ च्या मतदार यादीशी जोडणी योग्य प्रकारे झाली नाही, जी जोडणी झाली आहे ती चुकीची झाली असल्याची शक्यता आहे. विवाहीत महिलांना नावात बदल असल्याचे कारण देऊन या नोटीसा जारी करण्यात आल्या आहेत. त्यासाठी आवश्यक पुरावे घेऊन सहाय्यक निवडणूक अधिकाऱ्यांसमोर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहे. ठराविक दिवशी आणि ठराविक वेळी उपस्थित राहण्याचे निर्देश दिले जात आहेत. पण ही वेळ आणि कागदपत्रांची जुळवाजुळव करतांना मतदारांना कसरत करावी लागत आहे.

**“ ज्या मतदारांना नोटीसा आल्या आहेत. त्यांच्या सुविधेसाठी बुथ लेव्हल अथवा गाव पातळ्यांवर विशेष कॅम्पचे आयोजन केले जात आहे. ज्यात गणना प्रपत्रातील आक्षेप आणि त्रृटी दूर करण्यासाठी मतदारांकडून आवश्यक पुराव्यांचे संकलन करून घेत आहोत.**

**–नितीन वाघमारे, जिल्हा निवडणूक अधिकारी रायगड**

## माणगाव रेल्वे पुलावर ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू; आकस्मिक मृत्यूची नोंद

**माणगाव : बातमीदार**

माणगाव शहरातील निजामपूर रस्त्यावरील रेल्वे पुलावर ९ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री सुमारे ९.५० वाजण्याच्या सुमारास ७२ वर्षीय कांतिलाल बाळकृष्ण शेट यांचा रेल्वेच्या धडकेने मृत्यू झाला. या प्रकरणी त्यांचे ३६ वर्षीय पुत्र तुषार कांतिलाल शेट यांनी माणगांव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, कांतिलाल शेट यांनी आत्महत्या केल्याची शक्यता वर्तवली जात आहे, मात्र मृत्यूचे नेमके कारण अधिकृत तपासातून स्पष्ट होणे अपेक्षित आहे.या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू नोंद क्रमांक ७/२०२६ अन्वये भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) कलम १९४ अंतर्गत नोंद करण्यात आली आहे.

माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती आंधळे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक किरीवले यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. तसेच रेल्वे प्रशासनाशी संवाद साधून आवश्यक कार्यवाही केली.

ठाणे अंमलदार होडशीळ तसेच पोलीस शिपाई तांडेल, तिडके आणि नरोटे यांनीही या प्रकरणातील कार्यवाहीत सहभाग घेतला. मृतदेह शवविच्छेदनासाठी माणगाव उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला.माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार होडशीळ या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.या घटनेमुळे माणगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी (दि.९) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३२१ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून ३,१८,४५०/– रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या या सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# महाड नदीपात्रातील गाळ निर्मूलनात ‘नाम’चा महत्त्वपूर्ण वाटा!

**महाड : रामप्रहर वृत्त**



महाड तालुक्यातील नदीपात्रातील गाळ निर्मूलनाच्या कामात नाम फाउंडेशनने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.जलसंधारण, पाणीटंचाई निवारण आणि ग्रामीण भागातील जलस्रोतांचे पुनरुज्जीवन या उद्देशाने कार्यरत असलेल्या नाम फाउंडेशनच्या योगदानाची वाळण परिसरातील नागरिकांकडून आठवण काढण्यात आली.यानिमित्ताने फाउंडेशनचे संस्थापक, ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर आणि प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या सामाजिक कार्याला नागरिकांनी उजाळा दिला.

ग्रामीण भागातील पाणीटंचाईची समस्या दूर करण्यासाठी तसेच पावसाचे पाणी साठवून त्याचा भविष्यात उपयोग व्हावा, यासाठी नदीपात्रातील गाळ निर्मूलनाची कामे अत्यंत महत्त्वाची ठरतात. नदीपात्रात अनेक वर्षांपासून साचणाऱ्या गाळामुळे पाण्याची साठवण क्षमता कमी होते.अशा वेळी गाळ काढून नदीपात्र अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असते. या पार्श्वभूमीवर महाड तालुक्यातील गाळ निर्मूलनाच्या कामातील नाम फाउंडेशनचे योगदान विशेष महत्त्वाचे मानले जात आहे.

दुष्काळग्रस्त भागातील पाणीप्रश्न सोडविणे, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करणे आणि लोकसहभागातून ग्रामीण विकासाला चालना देणे, या उद्देशाने फाउंडेशनने विविध उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या या सामाजिक कार्यामुळे अनेक ठिकाणी जलसंधारणाबाबत जनजागृती निर्माण झाली असून, समाजातील विविध घटकांना अशा कामांमध्ये सहभागी होण्याची प्रेरणा मिळाली आहे.

वाळण परिसरातील नागरिकांनी महाड तालुक्यातील नदीपात्रातील गाळ निर्मूलनाच्या कामाचा उल्लेख करताना नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या सामाजिक योगदानाची आठवण काढली.समाजातील प्रश्न केवळ चर्चेपुरते मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष कृतीतून त्यावर उपाय शोधण्याची भूमिका त्यांच्या कार्यातून दिसून येते, अशी भावना यानिमित्ताने व्यक्त होत आहे. नदीपात्रातील गाळ निर्मूलनामुळे पाण्याची साठवण क्षमता वाढविण्यास मदत होऊ शकते.

त्याचबरोबर भूजल पुनर्भरण, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता आणि परिसरातील जलस्रोतांचे संवर्धन यांसाठीही अशा उपक्रमांचा उपयोग होतो. मात्र, या कामांचे दीर्घकालीन फायदे टिकवून ठेवण्यासाठी स्थानिक नागरिकांचा सहभाग आणि जलस्रोतांची नियमित देखभाल आवश्यक आहे.

महाड तालुक्यातील नदीपात्रातील गाळ निर्मूलनाच्या कामाच्या निमित्ताने नाम फाउंडेशनचे योगदान पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. वाळण परिसरातील नागरिकांनी नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा देत सामाजिक बांधिलकीचे महत्त्व अधोरेखित केले.जलसंधारणाच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी अशा उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन मिळावे, हीच अपेक्षा या निमित्ताने व्यक्त होत आहे.

काळ नदी बचाव समितीचे प्रमुख पदाधिकारी चंद्रकांत उत्तेकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.त्यांनी सांगितले की, काळ नदी बचाव समितीने ६ डिसेंबर २०२१ रोजी बाबासाहेब आंबेडकर महानिर्वाणदिनी चवदार तळे महाड येथे एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करून नदीतील गाळ काढण्याकरिता प्रशासनाचे लक्ष वेधले, त्याचा काहीही उपयोग झाला नाही परंतु दुर्दैवाने २२ जुलै २०२१ रोजी महाड शहर व ग्रामीण भागात पुराने जो थैमान घातला त्यानंतर प्रशासनाला व सरकारला तज्ञांची समिती नेमून महापुराबद्दल जाणून घेण्यास भाग पडले. नदीतील गाळ काढला गेला पाहिजे असे तज्ज्ञ समितीने सरकारला अहवाल दिला.

नाम फाउंडेशन व नाना पाटेकर यांच्याशी संपर्क साधला व पहिली मदत, नाम फाउंडेशनने पुढाकार घेऊन, महाड तालुक्यात वाळण विभागात काम करण्यास सुरुवात केली. नामने वाळण विभागात केलेले काम या कामाची राज्यस्तरावर दखल घेतली गेली. स्थानिक प्रशासन, राज्य सरकारशी स्वतः नानांनी पाठपुरावा केला त्याचे सर्व श्रेयस नाम फाउंडेशन व नाना पाटेकर यांना जाते.

काळ नदी बचाव समिती, जोपर्यंत प्रामाणिक काम करेल तोपर्यंत मशनरी व प्रशासनाकडून लागणारी मदत, देण्याचे नाना पाटेकर यांनी आश्वासन दिले, असे सांगून या दोघांनी केलेल्या सहकार्यामुळेच वाळण परिसरातील नागरिकांच्या पिण्याच्या समस्येला कायमस्वरूपी मार्ग प्राप्त होऊन हा परिसर आता जलयुक्त झाल्याचे नमूद केले.

## मुरुड–जंजिरा शाखेला उत्कृष्ट कोमसाप शाखेचा पुरस्कार जाहीर

**मुरुड : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या सन २०२४–२५ साठीचा वामनराव दाते स्मृती उत्कृष्ट कोमसाप शाखा पुरस्कार रायगड जिल्ह्यातील मुरुड–जंजिरा शाखेला जाहीर झाला आहे.

कोकण मराठी साहित्य परिषद, मुरुड–जंजिरा शाखा ही परिसरातील साहित्यिक आणि सांस्कृतिक चळवळ अधिक समृद्ध करण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. सार्वजनिक वाचनालय मुरुड , वसंतराव नाईक महाविद्यालय तसेच अंजुमन इस्लाम डिग्री कॉलेज ऑफ सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने शाखेतर्फे विविध साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यामध्ये कवी संमेलने, वक्तृत्व स्पर्धा, मराठी गझल मुशायरा आणि साहित्यिक वर्षा सहल यांसारख्या उपक्रमांचा समावेश आहे.

नवोदित कवी, लेखक आणि साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या साहित्यिक गुणांना प्रोत्साहन देणे आणि मराठी साहित्याची गोडी नव्या पिढीमध्ये निर्माण करणे, यासाठी शाखा सातत्याने प्रयत्नशील आहे. शाखेच्या या साहित्यिक कार्याची दखल घेत कोमसाप केंद्रीय कार्यकारिणी तर्फे हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

याबाबत माहिती देताना शाखाध्यक्ष तथा कोमसाप जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ यांनी सांगितले की, शाखेच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या आणि सदस्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे विविध साहित्यिक उपक्रम यशस्वीपणे राबवता आले. या पुरस्कारामुळे शाखेच्या कार्याला नवी ऊर्जा मिळणार असून, भविष्यातही अधिक व्यापक स्वरूपात साहित्यिक उपक्रम राबविण्यासाठी प्रेरणा मिळेल.या पुरस्काराचा वितरण सोहळा नोव्हेंबर महिन्यात मालगुंड येथील कवी केशवसुत स्मारकात पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

## तळा तालुक्यात प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग आणि महिला सक्षमीकरण अभियान

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील उसर खुर्द, येथे प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग (PMFME) योजना तसेच महिला सक्षमीकरण सेवा संकल्प अभियान कार्यक्रम नुकताच मंडळ कृषीअधिकारी संजय घालमे यांचे अध्यक्षतेखाली पार पडला आहे. सदर प्रसंगी गावातील शेतकरी, महिला गट मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी संजय घालमे यांनी उपस्थित शेतकरी महिला व महिला बचत गटांना प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेची सविस्तर माहिती देऊन या योजनेच्या माध्यमातून महिला व शेतकरी गटांना अन्नप्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी उपलब्ध असलेल्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले.

सहाय्यक कृषी अधिकारी अतुल बाबर यांनी महिला सक्षमीकरण या विषयावर मार्गदर्शन करताना महिलांनी विविध शासकीय योजनांचा लाभ घेऊन स्वयंरोजगार व उद्योगाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचे आवाहन केले.

तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक सचिन लोखंडे यांनी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत येणारे विविध प्रकल्प, उद्योगाच्या संधी, प्रक्रिया उद्योगासाठी आवश्यक बाबी तसेच योजनेच्या माध्यमातून मिळणाऱ्या सहाय्याबाबत उपस्थितांना सविस्तर माहिती दिली.

यावेळी उसर खुर्द गावातील शेतकरी महिला गट व महिला बचत गटातील सदस्यांना अन्नप्रक्रिया उद्योग, स्वयंरोजगार आणि शासनाच्या विविध योजनांबाबत माहिती जाणून घेतली.




## ग्रामपंचायत ही विकासाची शिल्पकार असते –सभापती पाटील




**पेण : प्रतिनिधी**

ग्रामपंचायत ही आपल्या गावाच्या विकासाचा कणा असते, सर्व विकास करण्याची क्षमता पंचायतीत असते आणि असा विकास डोलवी गावात झालेला पहायला मिळतो. गावात सर्व सुविधा झाल्या आहेत याबद्दल सरपंचांच्या कार्यक्षमता बद्दल अभिमान आहे.

यापुढे आपल्या गावातून स्पर्धा परीक्षा अभ्यास सेंटर, विद्यार्थी स्कॉलरशिप सुरु करावें असे आवाहन जिल्हा सभापती वैकुंठ पाटील यांनी डोलवी येथे केले. तर यावेळी डॉक्टर, गायिका, क्रीडा अशा विविध गुणवंतचाही सत्कार वैकुंठ पाटील सभापती, व पाहुणे यांचे हस्ते झाले.यावेळी ग्रामपंचायतचे सरपंच परशुराम म्हात्रे, उपसरपंच राजश्री माळी, माजी उपसरपंच सदस्य, रोहन म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते अनिलशेठ म्हात्रे, नरदास म्हात्रे,l आदी मान्यवर उपस्थित होते.

डोलवी ग्रामपंचायततर्फे शुद्ध पिण्याचे फिल्टर प्लांटचे उदघाटन, तसेच अत्याधुनिक व्यायामशाळेचे उदघाटन आणि विविध क्षेत्रातील गुणवंताचे सत्कार करण्याचा कार्यक्रम येथे संपन्न होतोय याबद्दल आनंद होत असल्याचे सरपंच परशुराम म्हात्रे यानी मनोगतात सांगितले. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट निवेदन एल एस जांभळे सर यांनी केले.

## माणगावमध्ये भातपिकावर रोगाचे संकट; तातडीने पंचनामे करण्याची मागणी

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात पावसाने दीर्घ उघडीप दिल्याने खरीप हंगामातील भातशेती संकटाच्या छायेत सापडली आहे. भातपीक वाढीच्या आणि दाणे भरण्याच्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर असतानाच पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पावसाअभावी शेतातील ओलावा झपाट्याने कमी होत असून काही भागांत भाताची रोपे पिवळी पडू लागली आहेत. पिकांची वाढ खुंटण्याची भीतीही व्यक्त होत आहे. वर्षभराच्या मेहनतीवर आणि शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांसमोर उत्पादनात घट होण्याचे संकट उभे ठाकले आहे.

खरीप हंगाम २०२५ मध्ये माणगाव तालुक्यात सुमारे ७,००० हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर भात लागवडीचे नियोजन होते. मात्र हंगामाच्या सुरुवातीलाच पावसाने दिलेला हुलकावणी आणि त्यानंतर झालेली अतिवृष्टी यामुळे भातक्षेत्रात घट झाली. प्रत्यक्षात ६,९५० हेक्टरवर भाताची लागवड झाली, तर नाचणी पीक ६५० हेक्टरवर घेण्यात आले. तालुक्याच्या ग्रामीण भागात भातशेती हाच शेतीचा प्रमुख आधार आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला झालेल्या पावसाच्या भरवशावर शेतकऱ्यांनी लागवड पूर्ण केली. रोपांची वाढ चांगली होईल आणि यंदा समाधानकारक उत्पादन हाती येईल, अशी आशा त्यांना होती.

परंतु सप्टेंबरमधील पावसाची अनियमितता आणि ऑक्टोबरच्या सुरुवातीपासून जाणवणारी उघडीप यामुळे या आशेवर पाणी फिरण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. भात पिकाच्या वाढीच्या निर्णायक टप्प्यावर पुरेशा पाण्याची गरज असते. मात्र पावसाने पाठ फिरवल्याने शेतातील पाण्याची पातळी घटत असून जमिनीतील ओलावाही कमी होत आहे. परिणामी काही ठिकाणी पिके पिवळी पडत असल्याचे चित्र आहे. ही स्थिती कायम राहिल्यास पिकांची वाढ, दाणे भरण्याची प्रक्रिया आणि अंतिम उत्पादनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.



**भरती - सुरक्षा रक्षक**

पगार : रु. 25,000 – रु. 28,000

**ड्युटी :** 12 तास
**वय :** 21 ते 50 वर्षे
**शैक्षणिक पात्रता**
किमान 10 वी पास
**पद :** सिक्युरीटी गार्ड
**पीएफ/ईएसआयसी/बोनस**
**आठवड्याला 1 दिवस सुट्टी**
**लोकेशन :** अजिवली गाव, पळस्पा फाट्याजवळ पनवेल.

**: संपर्क :**
8082592990
8082592995

**कागदपत्रे हरविलेबाबत**

मी, मिसेस कांचन प्रशांत महाजन, पत्ता : रा. गंगोत्री, साक्षी पार्क ०२, फ्लॅट नं अे ३०३ मालेवाडी सुकापूर नवीन पनवेल ४१०२०६

माझेकडून सुकापूर परिसरात प्रवास करीत असताना खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी खांदेश्वर शहर पोलीस ठाणे येथे मिसिंग केस केली असून त्याचा मिसिंग रजि. नं. ०७१६/२०२६ दिनांक. ९/१०/२०२६ रोजी नोंद केली आहे. त्याप्रकारचा त्यांचेकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

१. राहत्या घराचे शेअर्स प्रमाणपत्र

वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी कृपया फोन नं. ७०८३४४९३०४ वर संपर्क साधावा.

**दिनांक :– १०/१०/२०२६**

**सही/–**
**कांचन प्रशांत महाजन**

# तिहेरी हत्याकांडातील आरोपी जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

नवरात्रोत्सवाच्या बंदोबस्तादरम्यान पनवेल शहर वाहतूक पोलिसांनी दाखविलेल्या सतर्कतेमुळे बुलढाणा जिल्ह्यातील तिहेरी हत्याकांडातील फरार आरोपीला पकडण्यात यश आले. दीपक फतेसिंग सुरडकर (४४, रा. सोमठाणा, ता. चिखली, जि. बुलढाणा) असे त्याचे नाव असून त्याला पुढील तपासासाठी बुलढाणा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

ही कारवाई ९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पनवेल एसटी स्थानक परिसरात करण्यात आली. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस उपायुक्त डॉ. राहुल खाडे यांच्या आदेशानुसार पनवेल एसटी स्थानक परिसरात विशेष मोहीम राबविण्यात येत होती. यावेळी हाताला जखम झालेला एक इसम पोलिसांच्या नजरेस पडला. त्याच्या संशयास्पद हालचाली लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली त्याची चौकशी करण्यात आली. सुरुवातीला त्याने नाव आणि

## पनवेल वाहतूक पोलिसांची सतर्कता



पत्ता सांगण्यास टाळाटाळ केली. मात्र, विश्वासात घेऊन विचारपूस केल्यानंतर त्याने आपली ओळख दीपक फतेसिंग सुरडकर अशी सांगितली. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीची पडताळणी केली असता, तो बुलढाणा जिल्ह्यातील तिहेरी हत्याकांड प्रकरणातील पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार जमिनीच्या वादातून आई सरस्वती (७५), भाऊ संजय (४८) आणि पुतण्या रजित (२१) यांची हत्या केल्याचे संशयिताने चौकशीदरम्यान सांगितले. या घटनेनंतर पोलिसांच्या भीतीने तेथून निघून आल्याचेही त्याने सांगितल्याचे प्रसिद्धिपत्रकात नमूद आहे.या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांनी चिखली पोलीस ठाण्याचे निरीक्षक भूषण गावंडे आणि बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ठाकरे यांच्याशी संपर्क साधला. पडताळणीदरम्यान चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ८९५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम १०३(१), ३३३, ३५१(२) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल असल्याचे समोर आले.

वरिष्ठांच्या सूचनेनुसार संशयिताची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यानंतर चिखली पोलीस ठाणे आणि बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पनवेल शहर पोलीस ठाण्यातून त्याचा ताबा घेतला आणि पुढील तपासासाठी त्याला बुलढाणा येथे नेले. त्याला ताब्यात घेतल्याची माहिती त्याचे सासरे सिद्धेश्वर रंगनाथ वायाळ यांनाही देण्यात आली. या कारवाईत पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक विश्वनाथ पाटील, पोलीस अंमलदार संजय घाडगे, पोलीस हवालदार ढेंबरे, पोलीस नाईक केशव निकम आणि पोलीस अंमलदार महेंद्र गळवे यांनी सहभाग घेतला.

# बांधकाम प्रदूषणावर कारवाईचा बडगा

## नियम मोडणाऱ्यांविरोधात नवी मुंबई पालिका आक्रमक

**नवी मुंबई : बातमीदार**

आगामी हिवाळ्यात हवेची गुणवत्ता ढासळू नये आणि बांधकामांमुळे होणारे वायू प्रदूषण रोखण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने कडक पावले उचलली आहेत. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आर्किटेक्ट, बिल्डर्स, सर्व्हेअर्स आणि संबंधित भागधारकांची महत्त्वपूर्ण संयुक्त बैठक झाली. यावेळी उच्च न्यायालयाच्या आणि उच्चस्तरीय समितीच्या निर्देशांनुसार शहरातील सर्व बांधकाम ठिकाणी वायू प्रदूषण नियंत्रण उपायांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले.

या बैठकीला सहायक संचालक नगररचना सोमनाथ केकाण, नगररचनाकार युवराज चव्हाण, कार्यकारी अभियंता राजेश पवार, नगररचना विभागातील अधिकारी, अभियंते तसेच बांधकाम विकासक, वास्तुविशारद आणि कंत्राटदार उपस्थित होते. यावेळी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी स्पष्ट केले की, वाढते प्रदूषण आणि ढासळती हवेची गुणवत्ता ही केवळ कायदेशीर बाब नसून नागरिकांच्या आरोग्याशी जोडलेली गंभीर समस्या आहे. हिवाळ्यात प्रामुख्याने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनाचा त्रास असलेल्या रुग्णांना प्रदूषणाचा मोठा फटका बसतो. त्यामुळे बांधकाम व्यावसायिकांनी व्यवसायासोबतच आपली सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारी ओळखून नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

आपणही येथील नागरिक आहोत आणि हीच हवा श्वसनासाठी वापरतो, याचे गांभीर्य बाळगण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.प्रदूषण नियंत्रणासाठी महानगरपालिकेने काही महत्त्वाच्या उपाययोजना जाहीर केल्या आहेत. बांधकाम स्थळावर बांधकामासाठी तसेच धूळ जमिनीवर बसविण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करण्यास पूर्णपणे मनाई करण्यात आली आहे. बिल्डर्सनी यासाठी बिगर पिण्याचे किंवा प्रक्रिया केलेले पाणी वापरणे बंधनकारक आहे. याचे उल्लंघन झाल्यास कोणतीही सूट न देता तात्काळ काम थांबवण्याचे आणि जागा सील करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत. सर्व बांधकाम ठिकाणी ३० फूट उंचीचे बॅरिकेडिंग लावणे, इमारतीला वरून खालीपर्यंत पूर्णपणे झाकणारे ग्रीन नेट लावणे, वाहनांच्या चाकांमुळे रस्त्यावर धूळ पसरू नये म्हणून बाहेर पडण्याच्या मार्गावर टायर वॉशिंग सुविधा उभारणे आणि नियमित पाणी फवारणी करणे अनिवार्य आहे.

प्रत्येक बांधकाम क्षेत्रावर हवेची गुणवत्ता मोजणारे सेन्सर बसविणे आणि नागरिकांना हवेची सद्यस्थिती कळावी म्हणून एक्यूआय डिस्प्ले फलक लावणे बंधनकारक आहे. बीपीएमएसद्वारे आवश्यक प्रदूषण नियंत्रण उपाययोजनांची पूर्तता केल्याचे दस्तऐवज व बिल्डरचे, वास्तुविशारदाचे हमीपत्र घेतल्याशिवाय बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दिले जाणार नाही. नगररचना व विभाग कार्यालयांचे अधिकारी यांच्यामार्फत संयुक्त पाहणी मोहीम सुरू करण्यात येत आहे. बांधकाम ठिकाणी नियमांचे उल्लंघन आढळेल, तिथे तत्काळ काम थांबवणे, जागा सील करणे व दंड ठोठावणे अशी कारवाई करण्यात येईल, असे सहायक संचालक सोमनाथ केकाण यांनी स्पष्ट केले.

नियमांची माहिती सर्व बांधकाम विकासक व वास्तुविशारद यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी क्रेडाई व इतर बिल्डर असोसिएशनच्या समन्वयाने जनजागृती मोहीम राबवली जाणार आहे. नवी मुंबईतील पर्यावरण व नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी पालिका कटिबद्ध असून त्यासाठी संबंधित सर्व घटकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात आले आहे.



**पनवेल : भारतीय जनता पक्ष कार्यकर्ते, बूथ अध्यक्ष, श्री नारायण चैतन्य ट्रस्ट सेक्रेटरी, श्री अय्यप्पन सेवा संघाचे विश्वस्त, सामाजिक कार्यकर्ते आणि एसएनडीपी माजी सेक्रेटरी जयचंद्रन के. वासू यांचा ५६वा वाढदिवस शनिवारी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप महाराष्ट्र प्रदेश सचिव व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष व नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, नगरसेविका डॉ. अस्मिता घरत, भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते सुधाकर थवई, साऊथ इंडियन सेलच्या ॲड. सवीना बांगर, मित्र सुनीलकुमार, गावाहून आलेले जॉली राज, कायद्याच्या विद्यार्थिनी देवनंदा, सोपर्णिका व्ही.जे. यांनी पुष्पगुच्छ देत केक कापून शुभेच्छा दिल्या.**

# नवी मुंबई विमानतळावर स्वर्ल ट्रान्झिट हॉटेल सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रवाशांच्या सुविधांमध्ये भर घालत अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडने 'स्वर्ल ट्रान्झिट हॉटेल' सुरू केले आहे. टर्मिनल १ च्या आगमन स्तरावर असलेल्या या हॉटेलमध्ये ८० खोल्यांची व्यवस्था असून प्रवाशांना चार तासांपासून रात्रभर मुक्कामाची सुविधा उपलब्ध होणार आहे. विमानांच्या दरम्यान प्रतीक्षा करणारे, पहाटेच्या किंवा उशिराच्या विमानाने प्रवास करणारे प्रवासी या सुविधेचा लाभ घेऊ शकतील.



हॉटेलमध्ये शॉवर, उच्च गती इंटरनेट, कामासाठी स्वतंत्र टेबल, खोलीत भोजनसेवा तसेच विमानतळावरून आणण्या-नेण्याची सुविधा उपलब्ध आहे.हॉटेलमध्ये सहा प्रकारच्या खोल्यांसह ४० आसनक्षमतेचे चोवीस तास सुरू असलेले रेस्टॉरंट आहे. याशिवाय खोलीत भोजन, तातडीची कपडे धुलाई, गृहव्यवस्था आणि व्यावसायिक कामांसाठी आवश्यक सुविधाही देण्यात आल्या आहेत. अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडचे बिगर विमानतळ व्यवसाय विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुचित बन्सल यांच्या मते या सुविधेमुळे प्रवाशांना विमानतळ परिसरातच विश्रांती घेणे, ताजेतवाने होणे आणि काम करणे शक्य होणार आहे.

कंपनीच्या अन्य विमानतळांवरही अशा सुविधा विस्तारण्याची योजना आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील या नव्या सुविधेमुळे प्रवाशांना निवास आणि आतिथ्य सेवांचा अतिरिक्त पर्याय उपलब्ध झाला असून विमानतळावरील बिगर विमानतळ सेवांच्या विस्तारालाही चालना मिळणार आहे.

# सहयोग मंदिरात सुरांची मैफल

## पं. उमेश चौधरी यांच्या गायकीने जिंकली मने

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय अभिजात संगीताची समृद्ध परंपरा, किराणा घराण्याच्या गायकीचे लोभस सौंदर्य आणि सुरेल स्वरांच्या अविस्मरणीय अनुभूतीने ठाण्यातील सहयोग मंदिर येथे आयोजित १८वा पंडित फिरोज दस्तुर स्मृती संगीत समारोह रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला. पंडित फिरोज दस्तुर मेमोरिअल ट्रस्ट आणि उत्कर्ष मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या चार दिवसीय संगीत महोत्सवात नामवंत गायकांच्या शास्त्रीय गायनासह संतूर आणि संवादिनी वादनाची सुरेल मेजवानी रसिकांना अनुभवता आली.



रायगडचे सुपुत्र सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. उमेश चौधरी यांच्या सुमधुर, दमदार आणि भावपूर्ण गायकीने विशेष रंगत आणली. रागांची भावपूर्ण मांडणी, स्वच्छ आलापी आणि तानांच्या नजाकतीतून त्यांनी रसिकांना स्वरानंदाची अनुभूती दिली. पं. उमेश चौधरी यांनी आपल्या सादरीकरणाची सुरुवात 'राग मधुवंती'ने केली. या रागातील 'ए वो मोरे साई', 'लागी लागी रे' आणि 'रंग रलीया करत' या बंदिशी त्यांनी सुरेल अंदाजात सादर केल्या. प्रत्येक बंदिशीतील भाव, रागाचा विस्तार आणि स्वरांवरील पकड यातून त्यांच्या शास्त्रीय संगीताच्या अभ्यासाची प्रचिती आली. त्यानंतर 'राग कामोदी मल्हार'मधील 'मोरा भाग सुहाग तुम्ही से' ही रचना सादर करत त्यांनी आपले गुरू उस्ताद अस्लम खान यांना भावपूर्ण स्वरवंदना अर्पण केली. तसेच गुरूमाई विदुषी शुभदाताई पराडकर यांच्या शिकवणीतील पैलूंची आठवण त्यांनी करून दिली.

त्या अनुषंगाने गुरूंच्या सांगीतिक संस्कारांचे दर्शन घडवणाऱ्या या सादरीकरणाला रसिकांनी मनापासून दाद दिली. 'राग मेघमल्हार'मधील 'गरज गरज आज मेघ' या बंदिशीने उमेश चौधरी यांच्या गायकीचा विशेष प्रत्यय दिला. त्यांच्या खुल्या, खड्या आवाजातील स्वच्छ आलापी, सुरांवरील विलक्षण पकड आणि तानांची अप्रतिम नजाकत यामुळे रागाचे भावविश्व रसिकांसमोर जिवंत झाले. स्वरांच्या चढ-उतारांतून आणि रागाच्या प्रभावी मांडणीतून त्यांनी निर्माण केलेल्या वातावरणाने संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध झाले. त्यांच्या सादरीकरणाला रसिकांनी उत्स्फूर्त दाद देत मैफलीची रंगत वाढवली. त्यांना तबल्यावर गिरीश नलावडे आणि संवादिनीवर सिद्धेश ठक्कर यांनी उत्तम साथसंगत केली.

महोत्सवाच्या अंतिम सत्रात पंडित विनोद डिग्रजकर यांनी 'राग मारुबिहाग', 'राग मधुकंस' आणि 'राग रंगेश्वरी'मधील विविध बंदिशी सादर करत आपल्या समृद्ध गायकीची छाप उमटवली. अखेरीस 'इतना तो करना स्वामी' ही भैरवी सादर करून त्यांनी महोत्सवाची सांगता केली. त्यांना स्वप्नील भिसे आणि सिद्धेश बिचोलकर यांनी साथसंगत केली. सूत्रसंचालन रोशनी शिंदे यांनी केले, तर गिरीश संझगिरी यांनी आभार मानले.

समारोपप्रसंगी पंडित फिरोज दस्तुर यांच्या दुर्मीळ ध्वनिमुद्रिका ऐकवून त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. चार दिवसांच्या या संगीत महोत्सवाने अभिजात संगीताची समृद्ध परंपरा रसिकांसमोर उलगडली. विशेषतः पं. उमेश चौधरी यांच्या गायकीने गुरू-शिष्य परंपरेतील सांगीतिक संस्कार, रागदारी संगीताचे सौंदर्य आणि सुरांच्या साधनेतील निष्ठा यांचा प्रत्यय देत मैफलीत संस्मरणीय स्वरानुभव निर्माण केला.

# सृष्टी ४.० विज्ञान प्रदर्शनात 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एसआयईएस कॉलेज, नेरूळ येथे आयोजित 'सृष्टी ४.०' विज्ञान प्रदर्शनात सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचा गौरव वाढविला. "प्रत्येक थेंब मोजतो, प्रत्येक कृती महत्त्वाची असते" या घोषवाक्यांतर्गत चौथी आंतरशालेय व कनिष्ठ महाविद्यालयीन पर्यावरण प्रदर्शन स्पर्धा (इयत्ता ९वी ते १२वी) ३० सप्टेंबर रोजी एसआयईएस विद्यालय, नेरूळ येथे पार पडली.



घरी जलसंधारण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, जलप्रदूषण व उपाय, पाणी वाचवा, जीव वाचवा, शेतीमध्ये पाण्याचा शाश्वत वापर या विषयांतर्गत विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक प्रकल्प सादर केले. सीकेटीच्या गट १ मधील ऋषभ देशमुख व तपन पोडिली यांनी उत्कृष्ट प्रकल्प सादर करत प्रथम क्रमांक पटकावला. त्यांना पाच हजार रुपये रोख आणि ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

गट २मधील सार्थक श्रीवास्तव आणि ओंकार कोरे यांनी नाविन्यपूर्ण प्रकल्पासाठी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले. विद्यार्थ्यांचे हे यश त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता, टीमवर्क, मेहनत आणि समर्पणाचे द्योतक आहे. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, शाळा निरीक्षक संतोष चव्हाण, मुख्याध्यापिका स्वाती काळे, पर्यवेक्षिका नीरजा अदुरी, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले.

# 'सीकेटी'त अभिजात मराठी भाषा सप्ताह उत्साहात

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या मराठी विभाग व मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने ३ ऑक्टोबर रोजी साजऱ्या केल्या जाणाऱ्या अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त ३ ते १० ऑक्टोबर या काळात अभिजात मराठी भाषा सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या सप्ताहानिमित्त स्वरचित काव्यवाचन, वक्तृत्व आणि वादविवाद अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मराठी भाषेचे वैभव जपणे, विद्यार्थ्यांमध्ये भाषेविषयी अभिमान निर्माण करणे, साहित्याची आवड जोपासणे तसेच विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, वक्तृत्व कौशल्य आणि चिकित्सक विचारक्षमता विकसित करणे हा या उपक्रमांचा प्रमुख उद्देश होता. स्वरचित काव्यवाचन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कवितांचे प्रभावी सादरीकरण केले. वक्तृत्व स्पर्धेत समकालीन विषयांवर विचार मांडताना विद्यार्थ्यांनी आपल्या वक्तृत्व कौशल्याची चुणूक दाखवली, तर वाद-विवाद स्पर्धेत विविध सामाजिक, भाषिक आणि तंत्रज्ञानविषयक मुद्द्यांवर विद्यार्थ्यांनी युक्तिवाद केले.

वक्तृत्व स्पर्धेसाठी 'महाविद्यालयीन शिक्षणात मातृभाषेला अधिक प्राधान्य मिळावे का?', 'कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता वापर विद्यार्थ्यांच्या विकासासाठी तारक की मारक?' आणि 'सोशल मीडिया हे आजच्या तरुणांसाठी माहितीचे प्रभावी माध्यम आहे की दिशाभूल करणारे माध्यम?' असे विषय देण्यात आले होते. वादविवाद स्पर्धेसाठी 'मराठी भाषा : अस्तित्वापासून रोजगाराच्या भाषेपर्यंत', 'कृत्रिम बुद्धिमत्ता :



मराठी भाषेसाठी संधी की आव्हान?', 'सोशल मीडिया : अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य की व्यक्तिमत्त्वावरचे आक्रमण?' आणि 'वाचनसंस्कृती कमी होत आहे का? : मोबाईलच्या युगातील पुस्तकांचे स्थान' असे विषय निवडण्यात आले होते.

वक्तृत्व स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून अर्थशास्त्र विभागाचे प्रा. हरिभाऊ खरात, मराठी विभागप्रमुख प्रा. एम. एम. आंबुलगेकर आणि मराठी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापक प्रा. नम्रता कडू यांनी काम पाहिले. स्पर्धांच्या नियोजनाची आणि आयोजनाची जबाबदारी प्रा. नम्रता कडू यांनी पार पाडली. मराठी विभागप्रमुख प्रा. एम. एम. आंबुलगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. स्वरचित काव्यवाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक आदिती वाटवे (एसवाय बीएएफ), द्वितीय क्रमांक रिद्धी ठोकळ (एसवाय बीएमएस) आणि तृतीय क्रमांक संध्या म्हात्रे (एफवाय सीएस) यांनी पटकावला. जानवी करकरे (एसवाय बीए) हिने उत्तेजनार्थ प्रथम, तर सिद्धी म्हात्रे (एफवाय सीएस) हिने उत्तेजनार्थ द्वितीय पारितोषिक मिळवले.

वक्तृत्व स्पर्धेत आदिती वाटवे (एसवाय बीएएफ) हिने प्रथम, समीक्षा तांबोळी (एसवाय बीएएफ) हिने द्वितीय, तर साम केलटकर (एफवाय बीए) आणि गौरी वीरशेट्टी (एसवाय बीए) यांनी विभागून तृतीय क्रमांक मिळवला. हर्षाली मुकादम (एसवाय बीए) हिने उत्तेजनार्थ प्रथम, तर सिद्धी म्हात्रे (एफवाय सीएस) हिने उत्तेजनार्थ द्वितीय पारितोषिक पटकावले. वादविवाद स्पर्धेत एसवाय बीए गटातील हर्षाली मुकादम, जान्हवी करकरे, गौरी वीरशेट्टी आणि ज्योती तळे यांच्या गटाने प्रथम क्रमांक मिळवला.

एफवाय बीए गटातील साम केलटकर आणि एसवाय बीए गटातील वेदांत अहिरे यांच्या गटाने द्वितीय क्रमांक पटकावला. एफवाय सीएस गटातील सोनिया डेका, वेदिका खुटले, संध्या म्हात्रे, कनिष्का कोळी आणि योगिता चव्हाण यांच्या गटाने तृतीय क्रमांक मिळवला. तसेच एफवाय बायोटेक गटातील जान्हवी कांदे, अपूर्वा पाटील, पूर्वा पाटील, जान्हवी कामोटकर आणि साक्षी इथापे यांच्या गटाला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.




## शिरवणेत चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सेवा संकल्प अभियानांतर्गत शिरवणेगाव येथे गुरुवारी चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संसदीय कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला.

स्व. अरुण सुतार यांच्या स्मरणार्थ नवी मुंबई पालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा आयोजिण्यात आल्या होत्या. यावेळी चित्रकला स्पर्धेत ५०, तर वक्तृत्व स्पर्धेत १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. उत्कृष्ट आठ विद्यार्थ्यांची निवड करून नगरसेविका माधुरी जयेंद्र सुतार यांच्यातर्फे बक्षिसे वितरित करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापिका माधुरी नारखेडे यांसह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# पेण तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार -वैकुंठ पाटील

**नागोठणे : बातमीदार**

पाऊस व्यवस्थित न पडल्यामुळे पेण तालुक्यातील शेतकऱ्यांची मोठी दुर्दशा झाली असून, शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी जगायचे कसे, हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यासह पेण तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यासाठी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणार असून, माझ्या जिल्ह्यातील व तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाल्याशिवाय गप्प बसणार नाही, अशी ठाम ग्वाही रायगड जिल्हा परिषदेच्या कृषी व पशुसंवर्धन व दुग्ध समितीचे सभापती वैकुंठ पाटील यांनी दिली.



पेण तालुक्यातील नागोठणे जवळील शिहू विभागातील गांधेपाडा येथील श्री क्षेत्र कानिफनाथ मंदिरात सामाजिक कार्यकर्ते अनंत भुरे यांच्या स्वखर्चातून बांधण्यात आलेल्या सामाजिक सभागृह, लादी, रेलिंग तसेच मंदिराच्या स्लायडिंग खिडक्यांच्या कामांचे उद्घाटन व लोकार्पण वैकुंठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी वैकुंठदादा पाटील यांच्या समवेत माजी खासदार भाजप जिल्हा अध्यक्ष धैर्यशीलदादा पाटील, भाजप महिला मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षा शर्मिलाताई वैकुंठ पाटील, पेण नगरसेवक निलकंठ म्हात्रे, युवा नेते अनंत भुरे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख उद्धव कुथे, भाजप शिहू विभाग अध्यक्ष प्रफुल पाटील, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते के. के. कुथे, नारायण म्हात्रे, देविदास भुरे, महिला सामाजिक कार्यकर्त्या मेघा अनंत भुरे यांच्यासह भुरे कुटुंबीय व विभागातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वैकुंठ पाटील पुढे म्हणाले की, शिहू विभागात विकासकामांची मालिकाच सुरू केली असून जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जवळपास ८५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून विविध विकासकामांना प्रत्यक्ष सुरुवातही झाली आहे. जिल्हा परिषदेमध्ये आपली सत्ता असून सत्तेतील व्यक्ती विकासकामे आणू शकतो. आता डीपीडीसीमधून चार कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला असून, त्यातील ५० टक्के निधी आपल्या विभागासाठी देणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

लोकांच्या अंत्योदयापर्यंत सेवा करण्याचे कार्य करा, असा आदेश भारतीय जनता पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी आम्हा कार्यकर्त्यांना दिला आहे. त्यामुळे अखंडपणे समाजसेवेचे काम सुरू ठेवणार असून, कार्यकर्त्यांनी आपली ताकद निर्माण करण्याबरोबरच सर्वसामान्य जनतेचा विश्वास संपादन करावा, असा मौलिक सल्लाही वैकुंठ पाटील यांनी यावेळी दिला.यावेळी माजी खासदार धैर्यशील पाटील यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कुलदैवत कानिफनाथ मंदिरासाठी सामाजिक सभागृहकार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत सामाजिक कार्यकर्ते अनंत भुरे यांनी श्री क्षेत्र कानिफनाथ मंदिर हे भुरे कुटुंबीयांचे कुलदैवत असल्याचे सांगितले. गाव व समाजाला एकत्र आणण्यासाठी मंदिराची उभारणी करण्यात आली असून, या मार्गावरून जाणाऱ्या गावकरी, व्यापारी तसेच गरजू व्यक्तींना काही काळ विश्रांती घेता यावी, यासाठी स्वखर्चातून सामाजिक सभागृह उभारून चांगली व्यवस्था करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## मोटरसायकल अपघातात तरुणाचा मृत्यू; सहकारी गंभीर

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत- कल्याण राज्य मार्गावरील नेरळजवळील दामत येथे भरधाव मोटरसायकलचा भीषण अपघात होऊन २७ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. लकीभाऊ पवार असे मृत तरुणाचे नाव असून त्याचा साथीदार मनीष प्रकाश तांबरकर (२५) हा गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर भिवपुरी येथील रायगड हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

गुरुवार रात्री साडे सात वाजण्याच्या सुमारस शेलू येथील सनराईस रिसॉर्टमध्ये कुक म्हणून काम करणारा लकीभाऊ पवार आणि त्याचा साथीदार मनीष तांबरकर हे मोटरसायकलवरून शेलू येथून दामतच्या दिशेने निघाले होते. शेलू आणि दामत गावांच्या दरम्यान असलेल्या वळणावर मोटरसायकल वरील नियंत्रण सुटल्याने मोटरसायकल थेट विरुद्ध बाजूला गेली. यावेळी समोरून येणाऱ्या पिकअप टेम्पोला मोटरसायकलची जोरदार धडक बसली.

अपघातात लकीभाऊ पवार हा रक्ताच्या थारोळ्यात गंभीर अवस्थेत रस्त्यावर पडला होता तर मनीष तांबरकर यालाही गंभीर दुखापत झाली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत नेरळ पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पोलिस आणि स्थानिकांच्या मदतीने दोन्ही जखमींना रुग्णवाहिकेतून भिवपुरी येथील रायगड हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले.

उपचारापूर्वीच डॉक्टरांनी लकीभाऊ पवार याला मृत घोषित केले. मनीष तांबरकर याच्यावर उपचार सुरू आहेत. लकीभाऊ हा आंबेशिव पवारपाडा येथील रहिवासी होता तर मनीष तांबरकर हा टिटवाळा येथील इंदिरानगरचा रहिवासी असल्याची माहिती आहे. अपघाताची माहिती मिळताच दोन्ही कुटुंबीयांनी हॉस्पिटलमध्ये धाव घेतली. याबाबत अधिक तपास नेरळ पोलीस करीत आहेत.

## साई येथील रिक्षाचालकांनी स्वखर्चाने बुजवले रस्त्यावरील खड्डे

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील साई पंचक्रोशीतील वावे-मांद्रजला जोडणारा रस्ता गेल्या सहा ते सात वर्षांपासून खड्डेमय झाला होता. या रस्त्यावरून प्रवास करताना वाहनचालकांसह ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अखेर साई रिक्षा चालक-मालक संघटनेच्या सदस्यांनी पुढाकार घेत ८ ऑक्टोबर २०२६ रोजी स्वखर्चाने मातीचा डंपर आणून रस्त्यावरील खड्डे बुजवले. रिक्षाचालकांनी स्वतः श्रमदान करून केलेल्या या कामातून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवतानाच प्रशासनासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.



सुमारे एक किलोमीटर लांबीच्या या रस्त्यावरून साई गावासह दहिवली, वावे-मांद्रज, काकळकोंड आणि उसरखुर्द या गावांतील ग्रामस्थ, महिला, विद्यार्थी तसेच वाहनचालकांची नियमित ये-जा असते. मात्र, रस्त्यावरील खड्ड्यांमुळे प्रवास करताना अनेक अडचणी येत होत्या. ही समस्या लक्षात घेऊन रिक्षा संघटनेच्या सदस्यांनी पुढाकार घेत स्वखर्चाने खड्डे बुजवण्याचे काम पूर्ण केले.

साई येथील रिक्षा चालक-मालक संघटना केवळ प्रवासी वाहतुकीपुरती मर्यादित न राहता विविध समाजोपयोगी उपक्रमही राबवत असते. साई बसथांब्यावर संघटनेच्या वतीने नागरिकांसाठी पाणपोईची व्यवस्था करण्यात आली आहे. या सुविधेचा लाभ प्रवासी, पर्यटक, विद्यार्थी आणि अन्य नागरिक घेत आहेत. तसेच प्रवाशांना बसण्यासाठीही व्यवस्था करण्यात आली आहे.

रस्त्यावरील खड्डे बुजवल्यामुळे आता वाहनांची ये-जा अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. सार्वजनिक सुविधांसाठी रिक्षाचालकांनी दाखवलेल्या या पुढाकाराचे परिसरातील नागरिकांकडून स्वागत होत असून, समाधान व्यक्त केले जात आहे.

या उपक्रमासाठी रिक्षा संघटनेचे अध्यक्ष नरेश अधिकारी, उपाध्यक्ष अल्ताफ बंदरकर, सचिव मुब्बशीर राऊत, उपसचिव मंगेश मोरे, खजिनदार विनोद लाड, सदस्य प्रविण म्हामुणकर, सचिन पवार, अब्दाला सोलकर, उमेर सोलकर, हुसेनमिया खेरटकर, मनोज लाड, मंदार मोरे यांनी मेहनत घेतली.

## माणगाव तालुक्यात वॉटर बजेट संकल्पना राबवणार -सभापती शिंदे

**माणगाव : प्रतिनिधी**

भविष्यातील पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी आतापासूनच जलसंधारणाच्या उपाययोजना हाती घेण्याची गरज ओळखून पंचायत समिती माणगावचे सभापती विलास यशवंत शिंदे यांनी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींना प्रत्येक गावात किमान १० सांडपाणी बंधारे बांधण्याचे आवाहन केले आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेला लोकसहभागाची जोड देत गावागावांत जलसंधारणाची कामे करण्यावर त्यांनी भर दिला आहे.



सभापती शिंदे यांनी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी पत्राद्वारे तालुक्यातील ग्रामपंचायतींचे सरपंच व प्रशासनाला हे आवाहन केले आहे. पावसाचे पाणी अडवून जमिनीत मुरविणे, उपलब्ध जलस्त्रोतांचे योग्य नियोजन करणे आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन उपाययोजना करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने 'वॉटर बजेट' अर्थात पाण्याचे अंदाजपत्रक तयार करून गावातील पाण्याची उपलब्धता आणि गरज यांचा विचार करावा. ग्रामपंचायत क्षेत्रात वनराई बंधारे, कच्चे बंधारे आणि इतर जलसंधारणाच्या उपाययोजना राबवून किमान १० बंधारे उभारण्याचे नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आलेआहे.जलसंधारणाच्या कामांसाठी गावातील दानशूर व्यक्ती, उद्योजक, शिक्षणप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था, माजी विद्यार्थी आणि विविध मंडळांनी पुढाकार घ्यावा. ग्रामस्थांच्या सहकार्याने पाणी अडविण्याची कामे पूर्ण करून गावाची पाण्याची गरज भागविण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही आवाहन करण्यात आले आहे.

पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी ते गावातच अडवून जमिनीत मुरविण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न झाल्यास भूजलपातळी सुधारण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे ग्रामपंचायतींनी या आवाहनाची दखल घेऊन जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांची उद्या मुरुडमध्ये शोकसभा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुडच्या भूमीत आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करून आपल्या कसदार अभिनयातून सर्वांचे लक्ष वेधून घेणारे सुप्रसिद्ध सिने अभिनेते नाना पाटेकर यांची शोक सभा मुरुड तालुक्यातील जनतेच्या वतीने सोमवार (दि. १२ ) रोजी सकाळी ११ वाजता दरबार हॉल येथे सपन्न होणार आहे.या शोकसभेस खासदार सुनील तटकरे उपस्थित राहणार आहेत.



अभिनयाला केवळ व्यवसाय न मानता त्याला जगण्याचा मार्ग बनविणारे एक अष्टपैलू व्यक्तीमत्व म्हणजे नाना पाटेकर.मराठी माणसाच्या मनावर अधिराज्य गाजवणारे, रोखठोक आणि बेधडक स्वभावासाठी प्रसिद्ध असलेले नाना पाटेकर हे नाव आज प्रत्येक घरात आदराने घेतले जाते. नाना हे केवळ अभिनेते नव्हते तर ते एक विचार होते.त्यांचा साधेपणा, स्पष्टवक्तेपणा आणि समाजाप्रती आपुलकी असणारे व्यक्तिमत्व होते.

मुरुड-जंजिरा नगरीच्या मातीशी नाळ जोडलेले, आपल्या कार्याने आणि आठवणींनी मुरुडवासीयांच्या मनात विशेष स्थान निर्माण करणारे स्वर्गीय नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी समस्त मुरुडवासीयांतर्फे शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे.

नाना पाटेकर आणि रायगड-रत्नागिरीचे लोकप्रिय खासदार सुनीलजी तटकरे यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे आणि मैत्रीपूर्ण संबंध होते. या स्नेहपूर्ण नात्यामुळे या शोकसभेला विशेष भावनिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

नाना पाटेकर यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी त्यांच्या कार्याची महती सांगण्यासाठी त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी विशेष करून खासदार सुनील तटकरे उपस्थित राहणार आहेत. प्रसिद्ध सिने अभिनेते नाना पाटेकर व खासदार सुनील तटकरे यांची खास दोस्ती होती. त्यांच्या आकस्मित जाण्याने मोठी पोकळी निर्माण झाली असून आपल्या या खास मित्राबद्दल खासदार सुनील तटकरे त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देऊन जनतेच्या महासागरात आपल्या ओघवत्या वक्तृत्वाने नानांची खासियत त्यांचा परखडपणा व काही विशेष किस्से सांगून आपल्या या जिगरी दोस्तास आदरांजली अर्पण करणार आहेत.

## नवरात्रोत्सवात श्री गोरक्षनाथ मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील श्री गोरक्षनाथ मंदिर नवनाथ सत्संग मंडळाच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही श्री देवी नवरात्रोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, ११ ऑक्टोबर ते मंगळवार, २० ऑक्टोबर या कालावधीत विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रम भक्तिभावाने पार पडणार आहेत. या उत्सवाच्या माध्यमातून नामसाधना, ध्यानधारणा, गीतापारायण, देवीपूजन, यज्ञविधी, भजन आणि श्रीमद्भगवद्गीतेवरील प्रवचनांचा आध्यात्मिक लाभ भाविकांना घेता येणार आहे. अशी माहिती मंदिर देवस्थानचे उपाध्यक्ष सुभाष मस्के यांनी प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकातून दिली.



महान तपोनिधी ॐ चैतन्य ब्रह्मलीन प.पू. सद्गुरू माऊली बेटकर महाराज यांच्या कृपाशीर्वादाने, तसेच रायगड भूषण प.पू. सद्गुरू दादा महाराज शिंदे, रायगड भूषण प.पू. सद्गुरू यशवंत महाराज गायकवाड आणि ज्येष्ठ गुरुबंधू पूज्य खाडे महाराज यांच्या मार्गदर्शना खाली हा उत्सव आयोजित करण्यात आला आहे. उत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत दररोज सकाळी वैयक्तिक नामसाधना, ध्यान धारणा, गीतापारायण तसेच देवदेवतांची विधिवत पूजा आणि श्री देवी यज्ञविधी होणार आहेत. उपाध्याय सुभाष म्हस्के व उपाध्याय दत्तात्रेय करकरे यांच्या उपस्थितीत धार्मिक विधी पार पडतील. यानंतर अल्पोपहार, श्रीमद्भगवद्गीतेवरील प्रवचने आणि दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळच्या सत्रात शंका-समाधान, गीता प्रश्नमंजुषा, गुरुसेवा, यज्ञविधी आणि आरती असे कार्यक्रम होतील. त्यानंतर श्रीमद्भगवद्गीतेवरील प्रवचन, हरिजागर आणि नवनाथ सांप्रदायातील मंडळींच्या सहभागातून भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.

या उत्सवातील महत्त्वाचा धार्मिक कार्यक्रम म्हणजे नवनाथ सांप्रदायाचा नवीन नामधारक दीक्षाविधी. सोमवार, १९ ऑक्टोबर रोजी दुपारी २ ते ३ या वेळेत हा विधी होणार आहे. नवनाथ सांप्रदायाची दीक्षा घेण्यास इच्छुक असलेल्या भाविकांनी मंदिराच्या कार्यालयात आगाऊ नावनोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. दीक्षाविधीत सहभागी होऊन नामसाधनेचा मार्ग स्वीकारण्याची संधी इच्छुकांना मिळणार आहे. श्री गोरक्षनाथ मंदिर, ढालघर फाटा, मुंबई-गोवा महामार्ग, माणगाव येथे हा उत्सव होणार आहे. धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेण्यासाठी परिसरातील तसेच रायगड जिल्ह्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री गोरक्षनाथ मंदिर नवनाथ सत्संग मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक मंडळाचे अध्यक्ष सुरेश नारायण गायकवाड, अध्यक्ष शांताराम बा. खाडे, उपाध्यक्ष वामन न. मस्के, सचिव भास्कर स. मस्के, सहसचिव शांताराम सि. शिंदे, खजिनदार अनंत य. कडू तसेच मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य उत्सवाच्या आयोजनासाठी कार्यरत आहेत.

## क्षेत्रभेट विद्यार्थ्यांना निसर्ग अभ्यासास ठरली लाभदायक; १९३ विद्यार्थी, २७ शिक्षकांचा सहभाग

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील पिटसई केंद्राची शैक्षणिक दृष्टया व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास व पर्यावरण माहितीच्या दृष्टीने जगप्रसिद्ध कुडेलेणी येथे काढण्यात आली होती.



या क्षेत्रभेटीमधे केंद्राचे केंद्रप्रमुख नरेंद्र मूरतेली यांनी कुडे लेणीची माहिती सांगितली.यातून विद्यार्थ्यांना ऐतिहासिक स्थळ व इतिहासाची माहिती प्रत्यक्ष मिळाली याचा विद्यार्थ्यांना शिक्षणात उपयोग होणार आहे.तसेच परिसरातील पक्षी,परीसरातील वृक्ष,वेली यांचीही माहिती देऊन पर्यावरणाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले व आपल्या परिसरात होणारी पिके व निसर्ग देत असलेल्या साधनसामग्री बाबत माहिती देण्यात आल्याने परिसराची माहिती विद्यार्थ्यांना झाली.

यातून अनेक भागांचा अभ्यास प्रत्यक्ष झाल्याने त्याचा शिक्षणात उपयोग होणार आहे.या क्षेत्रभेटीत १४ शाळा,१९३ विद्यार्थी व २७ शिक्षका सहभागी झाले होते.

## रोह्यात कुंडलिका नदी संवर्धन प्रकल्पातील पटांगणाचे श्रीमती गीता द. तटकरे नामकरण

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीतील कुंडलिका नदी संवर्धन प्रकल्पातील पटांगणाचे श्रीमती गीता द. तटकरे पटांगण असे नामकरण करण्यात आले असून याचे खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते फीत कापून नामांकरण सोहळा करण्यात आला.



यावेळी आ. अनिकेत तटकरे, वरदाई ट्रस्टच्या वरदा तटकरे, जिप उपाध्यक्ष मधुकर पाटील, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, रोहा पंचायत समिती सभापती विजया पाशिलकर, उपसभापती संजय मांडलुस्कर, राकेश शिंदे, किसन मोरे, स्नेहल जगताप, प्रितम पाटील, हेमंत गांगल, रामचंद्र सकपाळ, समिर सकपाळ, समिर शेडगे, मनोजकुमार शिंदे, नंदकुमार म्हात्रे, राजेंद्र जैन, महेश कोलाटकर, निता हजारे, रवी चाळके, अजित मोरे, पुर्वा मोहीते, संजना शिंदे, महेंद्र गुजर, गौरी बारटक्के, प्रियांका धनावडे, माज सवाल आदी उपस्थित होते.

# एबी डिव्हिलियर्सचे वादळी शतक

## लेजेंड्स चॅम्पियनशिपमध्ये आफ्रिकेकडून ऑस्ट्रेलिया पराभूत

**शारजाह : वृत्तसंस्था**

एबी डिव्हिलियर्स आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला असला, तरी त्याच्या जलवा आजही कायम आहे. दक्षिण आफ्रिकेच्या या दिग्गज फलंदाजाने पुन्हा एकदा स्फोटक फलंदाजीची झलक दाखवली आहे. वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लेजेंड्समध्ये डिव्हिलियर्सने अवघ्या ३७ चेंडूंमध्ये शतक झळकावले. त्याच्या या वादळी खेळीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकन चॅम्पियन्सने ऑस्ट्रेलियन चॅम्पियन्सचा धुव्वा उडवला.



या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियन चॅम्पियन्सने पाच गडी गमावून २०९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकन चॅम्पियन्सने अवघ्या १५.४ षटकांत दोन गडी गमावून विजयाचे लक्ष्य गाठले.

२१० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकन संघाला दुसऱ्याच षटकात पहिला धक्का बसला. केन रिचर्डसनने फॅफ डु प्लेसिसला अवघ्या पाच धावांवर बाद केले, मात्र त्यानंतर मैदानात उतरलेल्या डिव्हिलियर्सने ऑस्ट्रेलियन गोलंदाजांची धुलाई केली. डिव्हिलियर्सने अवघ्या ३७ चेंडूंमध्ये शतक पूर्ण केले. त्याने ४० चेंडूंचा सामना करताना सहा चौकार आणि ११ षटकारांच्या मदतीने नाबाद १११ धावांची खेळी केली.

दुसऱ्या बाजूला रिचर्ड लेव्हीनेही शानदार फलंदाजी केली. त्याने २९ चेंडूंमध्ये तीन चौकार आणि पाच षटकारांच्या मदतीने ६२ धावा केल्या. डिव्हिलियर्स आणि लेव्ही यांनी मिळून १२७ धावांची भागीदारी केली. लेव्ही बाद झाल्यानंतर जेपी ड्युमिनीने डिव्हिलियर्सला साथ दिली आणि दक्षिण आफ्रिकेच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

त्याआधी ऑस्ट्रेलियन चॅम्पियन्सकडून डार्सी शॉर्ट आणि कर्णधार डेव्हिड वॉर्नर यांनी आक्रमक फलंदाजी करत संघाला मोठी धावसंख्या उभारून दिली. ऑस्ट्रेलियाला सुरुवातीलाच उस्मान ख्वाजाच्या रूपात धक्का बसला. तो नऊ धावा करून माघारी परतला. त्यानंतर वॉर्नर आणि शॉर्ट यांनी दुसऱ्या विकेटसाठी ९५ धावांची भागीदारी करत डाव सावरला. शॉर्टने अवघ्या २५ चेंडूंमध्ये सात चौकार आणि पाच षटकारांच्या मदतीने ६६ धावा कुटल्या, तर वॉर्नरने ३७ चेंडूंमध्ये पाच चौकार आणि दोन षटकारांसह ४८ धावा केल्या.

जो बर्न्सने २५ चेंडूंमध्ये नाबाद २८ धावा केल्या. त्याच्या खेळीत एक चौकार आणि तीन षटकारांचा समावेश होता. जोनाथन वेल्सनेही १२ चेंडूंमध्ये दोन चौकार आणि एका षटकारासह २३ धावा केल्या.

# माणगावच्या नीरजा कदमची सॉफ्ट टेनिस स्पर्धेत चमक

**माणगाव : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी तथा जिल्हा क्रीडा परिषद आणि रायगड सॉफ्ट टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तरीय सॉफ्ट टेनिस स्पर्धा रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर, पनवेल येथे मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत माणगाव ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी नीरजा संजय कदम हिने द्वितीय क्रमांक पटकावला. या यशामुळे तिची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या स्पर्धेत १४, १७ आणि १९ वर्षांखालील मुले व मुली या वयोगटातील सामने घेण्यात आले. रायगड जिल्ह्यातील विविध शाळा व ज्युनिअर कॉलेजमधील एकूण १२ नामांकित खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. यावेळी चुरशीच्या लढती झाल्या. यामध्ये नीरजा कदमने दुसरा क्रमांक मिळवला. तिला माणगाव ज्युनिअर कॉलेजचे क्रीडा शिक्षक रावळे व वाढवल यांचे तांत्रिक मार्गदर्शन लाभले तसेच क्रीडा मार्गदर्शक संजय गमरे यांनी तिला वेळोवेळी प्रोत्साहन दिले.

### विभागीय स्तरावर निवड



नीरजाच्या या यशाबद्दल माणगाव ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य, सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि पालकांनी तिचे अभिनंदन केले आहे तसेच तिच्या पुढील विभागीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# रणजी ट्रॉफीसाठी सौराष्ट्रच्या संघात रवींद्र जडेजाची एण्ट्री



**गांधीनगर : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा अनुभवी अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा पुन्हा एकदा लाल चेंडूच्या क्रिकेटमध्ये आपला जलक दाखवण्यासाठी सज्ज झाला आहे. रणजी ट्रॉफी २०२६–२७च्या पहिल्या सामन्यासाठी सौराष्ट्रच्या १६ सदस्यीय संघात जडेजाचा समावेश करण्यात आला आहे. जयदेव उनाडकटच्या नेतृत्वाखाली खेळणारा सौराष्ट्र संघ आगामी ११ ऑक्टोबरपासून छत्तीसगडविरुद्ध आपल्या मोहिमेला दणक्यात सुरुवात करणार आहे. राजकोटच्या निरंजन शाह स्टेडियमवर हा हाय–व्होल्टेज सामना खेळवला जाणार आहे.

नुकत्याच वेस्ट इंडिजविरुद्ध पार पडलेल्या एकदिवसीय मालिकेत भारतीय संघाने २–१ असा विजय मिळवला. या मालिकेत जडेजा भारतीय संघाचा भाग होता, मात्र, त्याला दोन सामन्यांत केवळ दोनच विकेट्स मिळाल्या आणि फलंदाजीची संधी मिळाली नाही. आता भारताला न्यूझीलंडविरुद्ध दोन कसोटी सामन्यांची महत्त्वाची मालिका खेळायची आहे. या मालिकेपूर्वी रेड बॉल क्रिकेटची लय आणि जुना फॉर्म परत मिळवण्यासाठी जडेजा रणजी ट्रॉफीच्या पहिल्या सामन्यात मैदानात उतरण्याचा मोठा निर्णय घेतला आहे.

न्यूझीलंडविरुद्धचा पहिला कसोटी सामना १९ ते २३ नोव्हेंबर दरम्यान वेलिंग्टन येथे, तर दुसरा कसोटी सामना २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबरदरम्यान क्राइस्टचर्च येथे होणार आहे. त्याआधी जडेजाचे रणजी खेळणे टीम इंडियासाठी अत्यंत फायदेशीर ठरणार आहे.

## जोकोविचला पराभवाचा धक्का!



**शांघाय :** रॉजर फेडररच्या कारकिर्दीतील सर्वाधिक 'एटीपी' विजेतेपदांच्या विक्रमाशी बरोबरी करण्याच्या दिशेने आगेकूच करणारा टेनिस जगतातील दिग्गज नोव्हाक जोकोविचला शांघाय मास्टर्स स्पर्धेत मोठा पराभवाचा धक्का बसला आहे. स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत पोलंडच्या ह्युबर्ट हुरकाझ याने जोकोविचचा ४–६, ३–६ असा सरळ सेटमध्ये पराभव करत त्याला स्पर्धेतून बाहेरचा रस्ता दाखवला.

काही दिवसांपूर्वीच बीजिंगमधील चायना ओपनमध्ये आपले १०२वे टूर–स्तरीय विजेतेपद जिंकून जोकोविच शांघायमध्ये दाखल झाला होता. २४ वेळा ग्रँड स्लॅम विजेता असणाऱ्या ३९ वर्षीय जोकोविचने बीजिंगच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या ॲलेक्स डी मिनॉरचा पराभव केला होता. त्यामुळे तो फेडररच्या १०३ 'एटीपी' विजेतेपदांच्या विक्रमाच्या अगदी जवळ पोहचला होता, मात्र शांघायमधील या पराभवामुळे त्याचे हे स्वप्न तूर्तास लांबणीवर पडले आहे.

# दुसऱ्या टी–२० सामन्यात विंडीजचा विजय

### शाई होपचे वादळी शतक

**रांची : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजने दुसऱ्या टी–२० सामन्यात भारताला सहा गडी राखून मात दिली. या सामन्यात नाणेफेकीचा कौल गमवल्यानंतर भारताने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत पाच गडी गमवून २४९ धावा केल्या. तसेच विजयासाठी २५० धावांचे आव्हान दिले होते, जे वेस्ट इंडिजने चार गडी गमवून १८.३ षटकात पूर्ण केले. या विजयासह पाच सामन्यांच्या टी–२० मालिकेत विंडीजने १–१ अशी बरोबरी साधली आहे.

यो सामन्यात कर्णधार शाई होपचे वादळ घोंगावले. त्याने ४५ चेंडूत नाबाद १०२ धावांची खेळी केली आणि संघाला विजय मिळवून दिला. होपने या खेळीत नऊ षटकार आणि सहा चौकार मारले. त्याला मधल्या फळीतून शेर्फेन रदरफोर्डची साथ मिळाली. त्याने मिळालेल्या जीवदानाचा फायदा घेत ३७ चेंडूत ८४ धावांची खेळी केली. या खेळीत त्याने प्रत्येकी सात चौकार आणि षटकार मारले.



या जोडीने चौथ्या विकेटसाठी ५४ चेंडूत १२० धावांची भागीदारी केली. त्यामुळे संघाचा विजय सोपा झाला. भारताकडून अक्षर पटेल सर्वात महागडा गोलंदाज ठरला. त्याने ३.३ षटकात ६३ धावा दिल्या. त्याला एकही विकेट घेता आली नाही. कुलदीप यादवने चार षटकात ५३ धावा देत एक विकेट घेतली. मयंक यादवने तीन षटकात ३६ धावा देत तीन विकेट काढल्या. अर्शदीप सिंगने चार षटकात ४५, शिवम दुबेने दोन षटकात ३० आणि नमन धीरने दोन षटकात २५ धावा दिल्या.

# संजू सॅमसनची युवराज सिंगच्या विक्रमाशी बरोबरी



**मुंबई : प्रतिनिधी**

वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या टी–२० सामन्यात भारताकडून डावाची सुरुवात करण्यासाठी आलेला अभिषेक शर्मा स्वस्तात माघारी परतला, पण संजू सॅमसनने एक बाजू सांभाळून ठेवली. या डावातही त्याला शतक झळकावण्याची संधी होती, मात्र तो ८२ धावा करून माघारी परतला. यादरम्यान अर्धशतक पूर्ण करताच त्याने मोठ्या रेकॉर्डमध्ये युवराज सिंगच्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे.

संजू सॅमसनने या डावात सुरुवातीपासूनच चौकार आणि षटकारांचा पाऊस पाडला आणि २१ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. यासह टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुन्हा एकदा २००पेक्षा अधिकच्या स्ट्राईक रेटने अर्धशतक केले आहे. संजूने आतापर्यंत टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पाच अर्धशतके २००हून अधिकच्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करताना झळकावली आहेत. या रेकॉर्डमध्ये त्याने युवराज सिंगच्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे. युवराजनेही आपल्या टी–२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत पाच अर्धशतके ही २००हून अधिकच्या स्ट्राईक रेटने पूर्ण केली होती. टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २००हून अधिकच्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करताना अर्धशतके झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत सूर्यकुमार यादव १३ अर्धशतकांसह अव्वल स्थानी आहे.

# होप–रुदरफोर्डच्या भागीदारीने सामन्याचे पारडे फिरले –अय्यर

**रांची : वृत्तसंस्था**

रांचीच्या मैदानात रंगलेल्या दुसऱ्या टी–२० सामन्यात २४९ धावांचा डोंगर उभारूनही टीम इंडियावर पराभवाची नामुष्की ओढावली. वेस्ट इंडिजने सहा विकेट्स आणि नऊ चेंडू राखून आंतरराष्ट्रीय टी–२० क्रिकेटच्या इतिहासातील दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वोच्च धावसंख्येचा यशस्वी पाठलाग केला. या पराभवानंतर भारतीय कर्णधार श्रेयस अय्यरने नेमके काय चुकले यावर भाष्य केले.

शाई होप आणि शेरफेन रुदरफोर्ड यांच्या आक्रमक फलंदाजीचे कौतुक करताना श्रेयस अय्यरने त्यांच्या भागीदारीमुळे सामन्याचे पारडे वेस्ट इंडिजच्या बाजूने झुकल्याचे मान्य केले. तो म्हणाला, "किती धावा पुरेशा ठरतील याचा अंदाज बांधणे




कठीण होते, कारण दवाचा मोठा परिणाम होतो. २४९ धावांचे लक्ष्यही दोन षटके शिल्लक असताना गाठण्यात आले.

गोलंदाजीसाठी आणखी एखाद्या पर्यायाचा विचार केला होता का या प्रश्नावर अय्यर म्हणाला, "या खेळपट्टीवर चूक करण्याची फारच कमी संधी होती. एखादा चेंडू योग्य टप्प्यावर टाकण्यात चूक झाली, तर तो थेट स्टँड्समध्ये जात होता. वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी किती अप्रतिम फलंदाजी केली हे तुम्ही पाहिलेच. काही संधी आम्ही गमावल्या, पण हा खेळाचाच एक भाग आहे. वेस्ट इंडिजच्या फलंदाजांचे श्रेय त्यांनाच द्यायला हवे. त्यांनी शानदार फलंदाजी केली."

संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि मयंक यादव यांच्या कामगिरीबद्दल बोलताना अय्यरने तिघांचेही कौतुक केले. तो म्हणाला, "या तिघांनीही आपापल्या भूमिकेत उत्कृष्ट कामगिरी केली. संजू आणि अभिषेक यांच्याकडून आम्हाला नेहमीच अशाच कामगिरीची अपेक्षा असते. ते सातत्याने चांगली कामगिरी करत आहेत, जबाबदारी स्वीकारत आहेत आणि संघाच्या डावाला गती देत आहेत. त्यांची कामगिरी उत्कृष्ट होती. मयंकनेही शानदार गोलंदाजी केली. त्याने मिळवलेल्या त्या तीन महत्त्वाच्या विकेट्समुळे आम्हाला पुढील टप्प्यात सामन्याची लय मिळाली, मात्र त्यानंतर झालेल्या भागीदारीमुळे सामना वेस्ट इंडिजच्या बाजूने झुकला."

# अभिषेक शर्माकडून एका डावात दोन विक्रमांना गवसणी



**नवी दिल्ली :** भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील पाच सामन्यांच्या टी–२० मालिकेतील दुसरा सामना रांची येथील स्टेडियमवर खेळवला गेला. या सामन्यात स्फोटक सलामीवीर अभिषेक शर्मा फक्त २० धावांची खेळी करून माघारी परतला, पण या छोट्याखानी खेळीत त्याने दोन विक्रमांना गवसणी घातली.

घरच्या मैदानावर टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एक हजार धावा पूर्ण करणारा तो सातवा भारतीय फलंदाज ठरला आहे. अभिषेकने घरच्या मैदानावर केवळ २९ सामन्यांत ३६.०७च्या सरासरीने १०१० धावा केल्या आहेत. भारतीय संघाकडून घरच्या मैदानावर टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम विराट कोहलीच्या नावावर आहे. त्याने ४६ टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांत ५०.८७च्या सरासरीने १५७७ धावा केल्या आहेत. याशिवाय हिटमॅन रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, ईशान किशन, हार्दिक पांड्या आणि केएल राहुल यांच्यानंतर अभिषेक शर्माचा नंबर लागतो.

टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पूर्ण सदस्यत्व असलेल्या संघांच्या खेळाडूंमध्ये पहिल्या षटकात सर्वाधिक षटकार मारण्याच्या बाबतीत अभिषेकने आयर्लंडच्या पॉल स्टर्लिंगला मागे टाकले आहे. त्याने असे १४ षटकार मारले आहेत. स्टर्लिंगच्या नावावर १३ षटकार आहेत.

# घरच्या मैदानावर खेळणे फायदेशीर ठरेल –फर्ग्युसन

**ऑकलंड : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसनने घरच्या मैदानावर खेळण्याचा अनुभव न्यूझीलंडच्या गोलंदाजांसाठी निश्चितच फायदेशीर ठरेल, असे म्हटले आहे. सोनी स्पोर्ट्सने शुक्रवारी आयोजित केलेल्या झूम पत्रकार परिषदेत फर्ग्युसनने संवाद साधला.

यावेळी बोलताना फर्ग्युसन म्हणाला की, न्यूझीलंड संघात वेगवान गोलंदाजांची मोठी फळी आहे, ज्यामुळे संघाला गोलंदाजीत अनेक चांगले पर्याय मिळतात. आगामी मालिकेत आपल्या वेगवान गोलंदाजीने भारतीय फलंदाजांना अडचणीत आणण्यासाठी आपण सज्ज आहोत, तर दुसरीकडे,



भारतीय फलंदाजांना येथील खेळपट्टीवरील बाउन्स आणि मैदानांच्या वेगवेगळ्या सीमारेषांनुसार आपली रणनीती आखावी लागेल.

एका प्रश्नाला उत्तर देताना फर्ग्युसनने सांगितले, न्यूझीलंडमध्ये मोठ्या मैदानांपासून ते इडन पार्कसारख्या छोट्या बाउंड्री असलेल्या मैदानांचा समावेश आहे. त्यामुळे येथील मैदानांचा आकार आणि परिस्थिती समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

भारताविरुद्धच्या या मोठ्या आव्हानासाठी पूर्णपणे तयार राहता यावे यासाठी आपण गेल्या काही महिन्यांपासून आपल्या फिटनेसवर कठोर मेहनत घेत असल्याचेही त्याने सांगितले. घरच्या मैदानावर खेळण्याबाबत उत्साह व्यक्त करताना फर्ग्युसन म्हणाला, न्यूझीलंडमध्ये आपल्या प्रेक्षकांसमोर आणि ओळखीच्या वातावरणात क्रिकेट खेळण्यापेक्षा उत्तम दुसरे काहीच नाही. भारतासारख्या बलाढ्य संघाचे यजमानपद भूषवणे ही एक अतिशय उत्तम संधी असून या आव्हानासाठी स्वतःला तयार करत आहे.

# आजपासून रणजी ट्रॉफीचा ९२वा हंगाम

**मुंबई : प्रतिनिधी**

रणजी ट्रॉफीचा ९२वा हंगाम रविवारी (दि.११) रोजी सुरु होत असून एलिट डिव्हिजनमध्ये ३२ संघ आणि प्लेट ग्रुपमध्ये सहा संघ सहभागी होतील. विजेतेपदाची शर्यत सुरु होत असताना प्राथमिक फेरीत देशभरात १९ सामने खेळले जातील. २०२५–२६ मधील त्यांच्या ऐतिहासिक विजयानंतर, गतविजेते जम्मू आणि काश्मीर श्रीनगरमध्ये मध्य प्रदेशविरुद्ध आपल्या विजेतेपदाच्या बचावाला सुरुवात करतील.

एलिट ग्रुपमधील ३२ संघांना प्रत्येकी आठ संघांच्या चार गटांमध्ये विभागण्यात आले आहे. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी आणि विजय हजारे ट्रॉफीसाठीचा काळ वगळता लीगचे सामने दोन फेऱ्यांमध्ये खेळले जातील. पहिली फेरी ११ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबरपर्यंत चालेल, तर दुसरी फेरी जानेवारी २०२७ मध्ये सुरु होईल. बाद फेरीचे सामने फेब्रुवारीमध्ये खेळले जातील आणि अंतिम सामना मार्चच्या सुरुवातीला होईल. संपूर्ण स्पर्धेत एकूण १३८ सामने खेळले जातील, जे सहभागी संघांसाठी त्यांचे सातत्य दाखवण्याची आणि संघाची क्षमता तपासण्याची एक मोठी कसोटी असेल.

एलिट डिव्हिजनचा पहिला टप्पा ११ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबरपर्यंत चालेल. मर्यादित षटकांच्या देशांतर्गत सामन्यांसाठी हंगामाच्या मध्यात विश्रांती घेतल्यानंतर लीग टप्पा १७ जानेवारी २०२७ रोजी पुन्हा सुरु होईल. गतविजेते जम्मू आणि काश्मीर मध्य प्रदेशविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करतील. पहिल्या फेरीतील इतर सामन्यांमध्ये, गोवा बडोद्याशी, मुंबई चंदीगडशी, बंगाल दिल्लीशी आणि सौराष्ट्र छत्तीसगडशी भिडतील.

# न्यूझीलंडला आणखी एक झटका!

## विल्यम ओ'रॉर्क दुखापतीमुळे संघाबाहेर

**क्राइस्टचर्च : वृत्तसंस्था**

आगामी भारत दौऱ्यापूर्वी न्यूझीलंडचा प्रमुख आणि घातक वेगवान गोलंदाज विल्यम ओ'रॉर्क दुखापतीमुळे एकदिवसीय आणि कसोटी मालिकेतून पूर्णपणे बाहेर झाला आहे. मुख्य प्रशिक्षक रॉब वॉल्टर यांनीही ही बाब संघासाठी निराशाजनक असल्याचे म्हटले आहे.

विल्यम ओ'रॉर्क गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने दुखापतींशी संघर्ष करत आहे. एप्रिल २०२५मध्ये पाठीच्या 'स्ट्रेस फ्रॅक्चर'मधून सावरल्यानंतर त्याने पुनरागमन केले होते, पण जूनमध्ये इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेदरम्यान त्याच्या मांडीचा स्नायू फाटला आणि त्यानंतर ऑगस्टच्या अखेरीस सरावादरम्यान त्याच्या पोटरीलाही दुखापत झाली. या सर्व




कारणांमुळे त्याला क्रिकेटपासून लांब राहावे लागले आहे.

न्यूझीलंडचे मार्क चैपमन आणि जॅक फॉल्क्स हेही दुखापतीमुळे भारताविरुद्ध २२ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या पाच सामन्यांच्या टी–२० मालिकेतून संघाबाहेर झाले आहेत. त्यांच्या जागी जोश क्लार्कसन आणि ब्लेअर टिकनर यांना संधी देण्यात आली आहे.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील टी–२० मालिकेनंतर १ नोव्हेंबरपासून पाच एकदिवसीय सामन्यांची मालिका सुरू होईल, तर त्यानंतर वेलिंग्टन आणि क्राइस्टचर्च येथे दोन कसोटी सामने खेळवले जाणार आहेत. प्रमुख गोलंदाजाची अनुपस्थिती न्यूझीलंडला जाणवेल.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com